दैनिक **संध्या**

निःपक्ष समीक्षणाचे....निर्भीड दैनिक

७० वर्ष निर्भीड पत्रकारीतेची

शनिवार, दि. १८ एप्रिल २०२६

www.dainikesandhya.com | www.youtube.com/@sandhyalivenews

संस्थापक : कै. वसंत काणे | नोंदणी क्रमांक : १६६३/१९५७ | पुणे आवृत्ती | पाने : ८ | अंक : ११३ | Gmail : news.sandhya@gmail.com | किंमत : ७ रुपये

# महिला आरक्षण घटनादुरुस्ती विधेयक नामंजूर

## विधेयकाच्या बाजूनं २९८ तर विरोधात २३० मतं, केंद्र सरकारला धक्का, इतर दोन विधेयकं सरकारकडून मागे

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या सरकारनं संविधान 131 वी दुरुस्ती विधेयक, 2026, केंद्रशासित प्रदेश कायदे दुरुस्ती विधेयक, 2026 आणि सीमांकन विधेयक, 2026 लोकसभेत सादर केली होती. या विधेयकांच्या बाजूनं पंतप्रधान नरेंद्र मोदी, केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्यासह सत्ताधारी पक्षातील विविध नेत्यांनी भूमिका मांडली. तर, विरोधी पक्षांकडून अखिलेश यादव, प्रियांका गांधी, लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी, अरविंद सावंत, अमोल कोल्हे, वर्षा गायकवाड, कल्याण बॅनर्जी यांच्यासह विरोधी पक्षांनी बाजू मांडली. हे घटनादुरुस्ती विधेयक असल्यानं मंजूर करण्यासाठी लोकसभेतील उपस्थित सदस्यांच्या दोन तृतियांश मते आवश्यक असतात. लोकसभेत या घटनादुरुस्ती विधेयकावर मतविभाजनाद्वारे मतदान घेण्यात आलं. घटनादुरुस्तीच्या बाजूनं पहिल्या फेरीत 298 मतदान झालं, तर घटनादुरुस्ती विधेयकाच्या विरोधात 230 मतं नोंदवली गेली आहेत. एकूण 528 खासदारांनी मतदानं केलं, आता राज्यसभेत उद्या मतदान होणार आहे. 528 चं दोन तृतियांश 352 होतं त्यामुळं घटनादुरुस्ती विधेयक मंजुरीसाठी आवश्यक संख्याबळ सरकारकडे नसल्याचं स्पष्ट झालं. लोकसभा अध्यक्ष ओम बिर्ला यांनी संविधान 131 वी दुरुस्ती विधेयक, 2026 नामंजूर झाल्याचं जाहीर केलं. यानंतर संसदीय कामकाज मंत्री किरेन रिजिजू यांनी इतर दोन विधेयकं पुढं न नेण्याचा निर्णय घेतला आहे.

केंद्र सरकारकडून महिला आरक्षण लोकसभेत आणि विधानसभेत संविधान 131 वी दुरुस्ती विधेयकात लोकसभेच्या जागा वाढवण्याचं प्रस्तावित केलं आहे. 2029 च्या निवडणुकीत लोकसभेच्या सध्याच्या 543 जागांमध्ये वाढ करुन राज्यातील लोकसभेच्या जागा 815 आणि केंद्रशासित प्रदेशांच्या जागा 35 जागा मिळून 850 जागा करण्याचा प्रस्ताव विधेयकात होता. सरकारचा महिला आरक्षणातील दुरुस्ती विधेयकासोबत लोकसभा मतदारसंघ पुनर्रचनेचं विधेयक मांडलं होतं. विरोधी पक्षांकडून नेमका याच मुद्याला आक्षेप होता. अमित शाह यांनी विरोधी पक्षांवर टीका करताना म्हटलं की 2023 मध्ये विरोधी पक्षाने महिलांना आरक्षण देण्याचा शब्द दिला होता आता द्यायचा विषय आलेला असताना मागं हटत आहेत. महिला आरक्षण लटकवत आहात, तुम्ही निवडणुकीत जिथं जिथं जात असाल तिथं तुम्हाला या देशातील महिलांचा आक्रोश सहन करावा लागेल, असं अमित शाह म्हणाले.

विरोधी पक्षांकडून महिला आरक्षण विधेयक 2023 मध्ये मंजूर करण्यात आल्याची भूमिका मांडण्यात आली. केंद्र सरकारचा महिला आरक्षण विधेयकासोबत परिसीमन विधेयक आणल्यानं विरोधी पक्षांनी सरकारच्या हेतूवर प्रश्नचिन्ह उपस्थित केलं.

# कॉर्पोरेट जिहाद प्रकरणावरुन संघटना आक्रमक; मालेगावात ठिय्या आंदोलन

**नाशिक (दै. संध्या)**



नाशिक जिल्ह्यातील मालेगावात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. कॉर्पोरेट जिहाद प्रकरणावरुन आंदोलन सुरु करण्यात आलं आहे. मोसम पुलावर कार्यकर्त्यांनी ठिय्या आंदोलन सुरु केले आहे. नाशिकमधील TCS प्रकरणावरुन संताप व्यक्त करण्यात येत आहे. आरोपीला तात्काळ अटक करण्याची मागणी देखील करण्यात येत आहे. बजरंग दल, VHP, संघ व भाजप कार्यकर्त्यांनी ही मागणी केली आहे. कॉर्पोरेट जिहाद प्रकरणाच्या पार्श्वभूमीवर मालेगावात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. शहरातील मोसम पुलावर कार्यकर्त्यांनी जोरदार आंदोलन छेडले आहे. नाशिकमधील TCS कंपनीशी संबंधित प्रकरणावरून संतप्त झालेल्या कार्यकर्त्यांनी प्रशासनाविरोधात तीव्र घोषणाबाजी केली. यावेळी मुख्य आरोपीला तात्काळ अटक करण्यात यावी, अशी ठाम मागणी आंदोलकांनी केली आहे. तसेच, भविष्यात अशा प्रकारच्या घटनांना प्रोत्साहन मिळू नये यासाठी प्रशासनाने कठोर कारवाई करावी, अशीही मागणी करण्यात आली आहे. या आंदोलनात बजरंग दल, विश्व हिंदू परिषद, संघ आणि भाजपचे कार्यकर्ते मोठ्या संख्येने सहभागी झाले होते. नाशिकमधील टीसीएस प्रकरणावरुन मालेगावात हिंदुत्ववादी संघटना आक्रमक झाल्या आहेत. नाशिकमधील टीसीएस (TCS) बीपीओ सेंटरमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, जबरदस्तीने धर्मांतर आणि ब्लॅकमेलिंगचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात काही वरिष्ठ टीम लीडर्ससह अनेक जण संशयित असून, ९ हून अधिक एफआयआर (FIR) दाखल आहेत. याप्रकरणी एसआयटी (SIT) चौकशी सुरू असून, आतापर्यंत अनेक जणांना अटक करण्यात आली आहे

क्युआर स्कॅन करून दै. संध्याच्या युट्युब चॅनलला सबस्क्राईब करा

SUBSCRIBE

www.sandhyaepaper.com

**ढिंग-टांग**




# मार्च २०२६ पासून अंदाजे ४.६८ लाख नवीन पीएनजीची जोडणी

**मुंबई (दै. संध्या)**




इराण इस्त्रायल अमेरिका युद्धाचा सर्वच देशावर परिणाम झाला आहे. भारतात देखील काही भागात गॅसची टंचाई निर्माण झाल्याचं चित्र पाहायला मिळालं होतं. दरम्यान, एलपीजी आणि कच्च्या तेलाच्या संदर्भात सरकारनं आता महत्वाची माहिती दिली आहे. देशात एलपीजी आणि कच्च्या तेलाची कोणतीही कमतरता नाही, असे सरकारने म्हटले आहे. देशात पुरवठा सामान्य आहे. वितरण यंत्रणा सुरळीत असल्याचं सरकारकडून सांगण्यात आलं आहे.

देशात एलपीजी आणि कच्च्या तेलाची कमतरता नसल्याचे सांगून सरकारने परिस्थिती स्पष्ट केली आहे. पेट्रोलियम मंत्रालयाच्या सहसचिव सुजाता शर्मा यांनी सांगितले की, देशात कच्च्या तेलाचा पुरेसा साठा असून देशांतर्गत ग्राहकांना प्राधान्याने एलपीजीचा पुरवठा केला जात आहे. सरकारच्या म्हणण्यानुसार, देशभरात एलपीजी वितरण पूर्णपणे कार्यरत आहे. कोणत्याही वितरक स्तरावर तुटवड्याचे वृत्त नाही. अलीकडेच, एकाच दिवसात अंदाजे 50 लाख सिलिंडरसाठी बुकिंगची नोंद झाली, तर वितरणाचा दर अंदाजे 93 टक्के होते. आता 98 टक्के बुकिंग ऑनलाइन होत असल्याने प्रक्रिया अधिक जलद आणि पारदर्शक झाली आहे. उन्हाळ्याच्या हंगामामुळे बुकिंगमध्ये किंचित घट झाली असून, हा आकडा आता अंदाजे 45 ते 46 लाख सिलिंडरवर पोहोचला आहे.

मार्च 2026 पासून, अंदाजे 4.68 लाख नवीन पीएनजी (पाईपद्वारे नैसर्गिक वायू) जोडण्या देण्यात आल्या आहेत. याशिवाय, नियमांचे उल्लंघन केल्याबद्दल 255 एलपीजी वितरकांना दंड ठोठावण्यात आला आहे, तर 55 जणांना निलंबित करण्यात आले आहे. 23 मार्चपासून 1.65 दशलक्षाहून अधिक लहान (5 किलो) सिलिंडरची विक्रीही झाली आहे. दरम्यान, देशातील सर्व बंदरे सामान्यपणे कार्यरत आहेत आणि कुठेही गर्दी नाही. याचा पुरवठा साखळीवर कोणताही परिणाम झालेला नाही.

# ॲक्सिस बँकेत असताना माझ्यासमोर अशी प्रकरणे झाली

## नाशिक TCS प्रकरणावरुन अमृता फडणवीसांचं मोठं वक्तव्य



**मुंबई (दै. संध्या)**

नाशिकमधील टीसीएस बीपीओ सेंटरमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, जबरदस्तीने धर्मांतर आणि ब्लॅकमेलिंगचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. या प्रकरणात काही वरिष्ठ टीम लीडर्ससह अनेक जण संशयित असून, 9 हून अधिक एफआयआर (FIR) दाखल आहेत. दरम्यान, या प्रकरणी राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या पत्नी अमृता फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मी ॲक्सिस बँकेत असताना माझ्यासमोर अशी प्रकरणे झाली होती.

**भारतीय संस्कृतीवर आधारित शिक्षण देणं आवश्यक**

लव्ह जिहादबाबत बोलताना अमृता फडणवीस म्हणाल्या की, आपल्या मुलींनादेखील थोडं अलर्ट राहायला सांगणं जरुरीचं आहे. आपण आपल्या संस्कृतीवर खूप प्रमाणिकपणे प्रेम केलं तर अशा केसेस होत नाहीत. आपले स्वतःचे तरुण सध्या संभ्रमात आहेत. त्यांना आपल्या स्वतःच्या पुराणांची आणि वेदांची माहिती नाही. त्यामुळं भारतीय संस्कृतीवर आधारित शिक्षण देणं आवश्यक असल्याची माहिती अमृता फडणवीस यांनी दिली.

वरिष्ठांनी तात्काळ त्या प्रकरणात कारवाई केली होती, असं वक्तव्य अमृता फडणवीस यांनी केलं आहे.

नाशिकमधील टीसीएस (TCS) बीपीओ सेंटरमध्ये महिला कर्मचाऱ्यांचे लैंगिक शोषण, जबरदस्तीने धर्मांतर आणि ब्लॅकमेलिंगचा गंभीर प्रकार उघडकीस आला आहे. यावर अमृता फडणवीस यांनी प्रतिक्रिया दिली आहे. मला खूपच खराब वाटतंय आणि खेद आहे की, कॉर्पोरेट्समध्ये अशाप्रकारच्या घटना होत आहेत. माझ्याही वेळेस, मी जेव्हा ॲक्सिस बँकेत होती तेव्हा अशा केसेस माझ्यासमोर झालेल्या आहेत. त्यावेळी वरिष्ठांकडून त्या मुलांच्या विरोधात कारवाई झालेली आहे. मला असं वाटतं की, असं झाल्यानंतर कारवाई करणं जरुरीचं आहे. तसेच आपल्या वरिष्ठांना सांगणं जरुरीचं आहे. त्याच्यानेच हे बंद होणार असल्याचे मत अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले.

स्त्रियांवर केसेस झाल्या होत्या असं माझ्या लक्षात आलं होतं, त्यानंतर कारवाई झाली होती. मला हे वाटत आहे, की आजकाल लव जिहादची प्रकरण खूप भयानक आहेत.

त्याच्यावर फ्रॉम ॲक्शन आता झाली असल्याचे मत अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले. आता आपल्या मुलींनाही थोडं अलर्ट राहणं जरुरी आहे. आपला संस्कृती फॉलो केली तर असं कधी होऊ शकत नाही असे मतं अमृता फडणवीस यांनी व्यक्त केले.

**ब्रेकिंग न्यूज**

## १२ प्रभाग समित्यांची निवडणूक बिनविरोध

पुणे (दै. संध्या) : महापालिकेच्या क्षेत्रीय कार्यालयांतील प्रभाग समिती अध्यक्ष पदाच्या निवडणुकीसाठी १५ पैकी १२ ठिकाणची निवडणूक बिनविरोध झाली आहे. तीन क्षेत्रीय कार्यालयांमध्ये भाजप-राष्ट्रवादी कॉंग्रेस विरुद्ध कॉंग्रेस अशी निवडणूक होणार आहे. भाजपने युतीधर्म पाळत राष्ट्रवादी कॉंग्रेसला एक जागा सोडली आहे. प्रभाग समितीची निवडणूक मंगळवारी (ता. २१) होणार आहे. पुणे महापालिकेत भाजपचे ११९, राष्ट्रवादी कॉंग्रेसचे २७, कॉंग्रेसचे १५, राष्ट्रवादी कॉंग्रेस शरदचंद्र पवार पक्ष ३, शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्ष १ असे पक्षीय बलाबल आहे. यामध्ये भाजपचे नगरसेवक सर्वाधिक असल्याने १५ पैकी १४ क्षेत्रीय कार्यालयांमध्ये भाजपचा अध्यक्ष होणार हे स्पष्ट होते. राष्ट्रवादी कॉंग्रेसला येरवडा वडगाव शेरी क्षेत्रीय कार्यालयात संधी होती. पण त्याची हद्द बदलण्यात आल्याने तेथेही भाजपचा अध्यक्ष होणार होता. यावरून भाजप आणि राष्ट्रवादी कॉंग्रेसमध्ये मतभेद निर्माण झाले होते. राष्ट्रवादीच्या पदाधिकाऱ्यांनी उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांच्याकडे तक्रार केली होती. त्याचे पडसाद उमटल्याने भाजपच्या कोअर कमिटीची बैठक गुरवारी रात्री पार पडली.

**दै. संध्या अँकर** विविध शासकीय योजनांची माहिती प्रभावीपणे मांडा

# स्वतंत्र कार्यप्रणाली विकसित करावी : डॉ. नीलम गोऱ्हे

**मुंबई (दै. संध्या)**



राज्य शासनाच्या महिला धोरणांतर्गत महानगरपालिका क्षेत्रात महिला सुरक्षेसाठी राबविण्यात येणाऱ्या उपाययोजनांच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी नगरविकास विभागाला मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत. या सूचनांच्या आधारे समानतेचा विचार पुढे नेत महिलांच्या विशेष गरजा ओळखून स्वतंत्र व परिणामकारक कार्यप्रणाली विकसित करावी, असे निर्देश विधानपरिषदेच्या उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी दिले.


१६ एप्रिल २०२६ रोजी उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे यांनी उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांची भेट घेऊन महिला सुरक्षेसंदर्भात पुढील मार्गदर्शन व सहकार्याबाबत निवेदन सादर केले होते. महिला सक्षमीकरण व सुरक्षेबाबत नगरविकास विभागाकडून करावयाच्या उपाययोजना व कार्यवाहीच्या संदर्भात त्यांच्या अध्यक्षतेखाली विधान भवनात बैठक पार झाली. बैठकीस नगरविकास विभागाचे उपसचिव अजिंक्य बगाडे तसेच अक्षरा सेंटर, मुंबईच्या सहसंचालक नंदिनी शाह यांच्यासह अधिकारी उपस्थित होते. उपसभापती डॉ. गोऱ्हे म्हणाल्या की, सार्वजनिक ठिकाणी महिलांसाठी सुविधा उपलब्ध करण्यावर विशेष भर देणे आवश्यक आहे. उद्याने, क्रीडांगणे, मॉल्स व बाजारपेठांमध्ये महिलांच्या गरजा लक्षात घेऊन सुविधा विकसित कराव्यात. तसेच स्वच्छ व मानक कार्यपद्धती असलेली पाळणाघरे व शिशुगृहे उपलब्ध करून देण्यात यावीत. सार्वजनिक उद्यानांमध्ये ठराविक वेळ महिलांसाठी व त्यांच्या सोबत येणाऱ्या लहान मुलांसाठी राखीव ठेवण्याबाबतही विचार करावा. तसेच राज्यातील सर्व महानगरपालिका क्षेत्रांमध्ये निर्जन व अंधाऱ्या ठिकाणी पुरेशी प्रकाश व्यवस्था करावी. बाजारपेठा, घाट व बसथांबे परिसरात स्वच्छतागृहांची सोय करण्यात यावी. महिलांच्या सुरक्षेसंदर्भातील योजनांच्या अंमलबजावणीत कोणतीही त्रुटी राहणार नाही, याची दक्षता घेण्याचेही त्यांनी निर्देश दिले. महिलांसाठी राबविण्यात येणाऱ्या विविध शासकीय योजनांची माहिती प्रभावीपणे पोहोचण्यासाठी प्रत्येक वॉर्डमध्ये महिला मदत केंद्र स्थापन करावीत, अशी सूचनाही त्यांनी केली. महिलांच्या सर्वांगीण सक्षमीकरणासाठी जेंडर रिसोर्स सेंटर उभारणे, तक्रार निवारण प्रणाली अधिक सक्षम करणे, तसेच नाविन्यपूर्ण उपक्रमांना चालना देणे आवश्यक असल्याचे त्यांनी नमूद केले.

याशिवाय, राज्यातील सर्व महापालिकांच्या परिवहन सेवांमध्ये महिलांच्या सुरक्षिततेस प्राधान्य देण्यासाठी आवश्यक सूचना देण्यात याव्यात. बसस्थानकांवरील सुविधा, सुरक्षितता, अलार्म व्यवस्था तसेच मोठ्या बस डेपोमधील अडचणींकडेही विशेष लक्ष देणे गरजेचे आहे. यासाठी नगरविकास विभागाने सर्व महापालिकांच्या परिवहन विभागांसोबत समन्वय साधून बैठक आयोजित करावी, असेही त्यांनी सांगितले.

विधिमंडळाचे कामकाज प्रत्यक्ष अनुभवण्यासाठी नीता मुकेश अंबानी शाळा येथील सुमारे ६० विद्यार्थ्यांनी विधानभवनाला भेट दिली. या भेटीत उपसभापती डॉ. नीलम गोऱ्हे आणि मंत्री आदिती तटकरे यांनी विद्यार्थ्यांशी संवाद साधला. उपसभापती डॉ. गोऱ्हे यांनी अतिशय सोप्या आणि विद्यार्थ्यांना समजेल अशा भाषेत विधिमंडळाचे कामकाज उलगडून सांगितले. "जशी शाळेत शिस्त पाळली जाते, तसेच विधानभवनातही नियमांचे काटेकोर पालन केले जाते. नियम मोडल्यास इथेही शिक्षा होते," असे सांगत त्यांनी वरिष्ठ व कनिष्ठ सभागृह, सदस्यांची रचना आणि नियमांची अंमलबजावणी याबाबत रंजक उदाहरणांसह माहिती दिली. विद्यार्थ्यांनीही उत्साहाने प्रश्न विचारत संवाद रंगवला.

# धर्माच्या आधारे आम्ही आरक्षण देणार नाही : अमित शाहांनी मांडली भूमिका

**नवी दिल्ली (दै. संध्या)**



देशात महिला आरक्षण आणि मतदार पुनर्रचना (131 वी घटनादुरुस्ती) विधेयकावर चर्चा असताना केंद्रीयमंत्री अमित शाह यांनी विरोधकांना लक्ष्य केलं. तसेच, लोकसभा निवडणुकांसाठी मतदार पुनर्रचनेची गरजही व्यक्त केली. लोकसभेच्या एका एका मतदारसंघात 49 लाख मतदार आहेत, म्हणून संविधानात परिसीमनाची /पुनर्रचना तरतूद करण्यात आली आहे. जे परिसीमनाचा विरोध करतात ते SC/ST जागा वाढण्याचा विरोध करतात, असे म्हणत केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत महिला आरक्षण आणि मतदार पुनर्रचना संदर्भातील 131 वी घटनादुरुस्तीच्या अनुषंगाने सुरू असलेल्या चर्चेत सहभागी होत सरकारची भूमिका मांडली. इंडी आघाडीचा विरोध अंमलबजावणीचा नाही, तर केवळ महिला आरक्षणाचाच विरोध आहे, असे म्हणत विरोधकांवर हल्लाबोल केला. तसेच, धर्माच्या आधारावर आम्ही आरक्षण देणार नाही, आणि भविष्यात कोणाला देऊ पण देणार नाही, असेही शाह यांनी परखडपणे सांगितले. इंडी आघाडीच्या सर्व सदस्यांनी जर-तर चा आधार घेत लोकसभा आणि विधानसभेत महिला आरक्षणाला विरोध केला आहे. हा विरोध अंमलबजावणीचा नाही, तर केवळ महिला आरक्षणाचाच विरोध आहे, असे म्हणत विरोधकांवर हल्लाबोल केला. तसेच, धर्माच्या आधारावर आम्ही आरक्षण देणार नाही, आणि भविष्यात कोणाला देऊ पण देणार नाही, असेही शाह यांनी परखडपणे सांगितले. संविधानाने सर्वसमावेशक आणि व्यवहार्य लोकशाही चौकट तयार करण्याची जबाबदारी सरकारला दिली आहे. संघराज्य रचना टिकवून ठेवणे, लोकसंख्येच्या आधारावर लोकांनी निवडून लोकसभेत येणे आणि राज्यांची शक्ती अबाधित राखणे हे परिसीमनाचे उद्दिष्ट आहे. तेलंगणाच्या मलकाजगिरीमध्ये 48 लाख मतदार आहेत. बेंगळुरू उत्तरमध्ये 29 लाख, बेंगळुरू दक्षिणमध्ये 29 लाख आणि गाझियाबादमध्ये 28 लाख मतदार हे लोकसभा मतदारसंघात आहेत. देशात लोकसभेच्या 127 जागा अशा आहेत जेथे 20 लाखांहून अधिक मतदार आहेत. जेथे 48 लाख मतदार आहेत, तेथील खासदार एवढ्या मोठ्या लोकसंख्येच्या अपेक्षा कशा पूर्ण करू शकतो का? असा सवाल अमित शाह यांनी विचारला.

# संपादकीय

## लैंगिक छळाविरुद्ध दाद मागण्यासाठी 'पॉश'ची मदत

पॉश (POSH) हा सध्या फार चर्चेत असलेला शब्द आहे. POSH म्हणजे प्रिव्हेन्शन ऑफ सेक्शुअल हॅरॅसमेंट. THE SEXUAL HARASSMENT OF WOMEN AT WORKPLACE (PREVENTION, PROHIBITION AND REDRESSAL) ACT, 2013) हे या कायद्याचं पूर्ण नाव आहे. या कायद्याची सुरुवात झाली ती १९९२ साली राजस्थानात झालेल्या भंवरीदेवीच्या केसमुळे. तथाकथित कनिष्ठ जातीत जन्मलेली भंवरीदेवी ही राजस्थान सरकारच्या त्यावेळच्या ग्रामीण विकास कार्यक्रमात नोकरी करत होती. त्या कामाचा भाग म्हणून तिने गावात होणाऱ्या एका मुलीच्या बालविवाहाला विरोध केला. पोलिसांची मदत घेऊन तिने ते लग्न थांबवलं. ती मुलगी सवर्ण जमीनदार घरातील होती. सूड म्हणून त्या घरातील पुरुषांनी तिच्यावर बलात्कार केला, असा तिने आरोप केला. तिचा नवरा भक्कमपणे तिच्या पाठीशी उभा राहिला. खालच्या कोर्टात केस तिच्याविरूद्ध गेली. त्यामुळे देशभरातील महिला संघटनांनी एकत्र येऊन या विषयावर सुप्रीम कोर्टात जनहीत याचिका दाखल केली. या याचिकेचा जो निकाल सर्वोच्च न्यायालयाने दिला तोच प्रसिद्ध असा 'विशाखा निकाल.' तिथून महिलांचा कामाच्या ठिकाणी होणारा लैंगिक छळ हा विषय राष्ट्रीय पातळीवर चर्चेत आला. मग सर्व सरकारी, निमसरकारी आणि खासगी आस्थापनांत विशाखा समिती स्थापन करावी, असा सरकारने आदेश दिला. देशभरात अशा समित्या स्थापन झाल्यानंतर लक्षात आलं, महिलांचा कामाच्या ठिकाणी लैंगिक छळ, ही बऱ्यापैकी सार्वत्रिक बाब होती. त्यामुळे २०१३ साली या विशाखा निकालाचं रुपांतर 'पॉश' या कायद्यात करण्यात आलं. सर्व सरकारी, निमसरकारी आणि खासगी आस्थापनांमध्ये १०पेक्षा जास्त कर्मचारी असल्यास तिथे अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन करणं या कायद्याने बंधनकारक आहे. समितीची अध्यक्ष आस्थापनेतील ज्येष्ठ महिला असावी, महिलांची संख्या ५० टक्क्यांपेक्षा जास्त असावी, त्यात किमान दोन कर्मचारी असावेत व एक बाहेरील सदस्य - शक्यतो महिलाप्रश्नी काम करणारी सामाजिक व्यक्ती किंवा वकील असावी. या समितीची बैठक तीन महिन्यातून किमान एकदा व त्याखेरीज गरजेप्रमाणे घेण्यात यावी. हा कायदा मुख्यतः महिलांना कामाच्या ठिकाणी होणाऱ्या लैंगिक छळाविरूद्ध दाद मागण्यासाठी सुरक्षित जागा निर्माण करून देतो. परंतु, काही वेळा त्या आस्थापनेतील अत्यंत वरिष्ठ पदावर असणारी एखादी व्यक्तीच लैंगिक छळ करणारी गुन्हेगार असते. काही वेळा आस्थापनेचा मालकच कर्मचाऱ्यांचा लैंगिक छळ करत असतो. अशा वेळी अंतर्गत तक्रार निवारण समितीतून न्याय मिळेल, असा विश्वास महिलांना वाटत नाही. काही वेळा आस्थापनेतील सदस्यांची संख्या १०पेक्षा कमी असल्याने तिथे अंतर्गत तक्रार निवारण समिती स्थापन केलेली नसते. काही वेळा महिला असंघटित क्षेत्रात काम करत असतात. उदा. घरेलू कामगार महिला, काच - कागद - पत्रा वेचक महिला, रोजंदारीने मजुरी करणाऱ्या महिला. या महिलांवर कामाच्या ठिकाणी लैंगिक अत्याचार होत असतील तर त्यांनी कुठे जायचं? -अशा सर्व महिलांसाठी प्रत्येक जिल्ह्याच्या ठिकाणी स्थानिक तक्रार निवारण समिती स्थापन केलेली असते. या समितीत जिल्हा महिला बालविकास अधिकारी, त्या कार्यालयातील किमान एक कर्मचारी, एक वकील आणि दोन अशासकीय महिला असे सदस्य असतात. एखाद्या महिलेने अंतर्गत किंवा स्थानिक तक्रार निवारण समितीत तक्रार दाखल केली, तर तिची लेखी तक्रार स्वीकारली जाते. समोरील व्यक्तीला तिची बाजू मांडण्याची संधी दिली जाते. दोन्ही बाजूंनी दाखल केलेले साक्षीपुरावे तपासले जातात. समिती एकत्र विचारविनिमय करून प्रश्न सोडविण्यासाठीच्या सूचना आस्थापनेच्या सर्वोच्च व्यक्तीला देते. या समितीत प्रश्न सुटला नाही तर तक्रार करणारी व्यक्ती न्यायालयात दाद मागू शकते.

## संस्कृत सुभाषित

कल्पतरू खाली । फळे येती मागितली
तेथे बैसल्याचा भाव । विचारूनी बोले ठाव ।
द्यावे ते उत्तर । येतो प्रति त्याचा फेर
तुका म्हणजे मनी । आपुल्याच लाभ हानी ।
खल: कापट्या दोषेन दूरेणैव विसृज्यते । अपाय
रांकिमिलौके विषेणाशी विषो यथा ।

## गुरु वचन

### सौंदर्य व प्रेम

सौंदर्य व प्रेम एकमेकांवर आधारलेले आहेत, जिथे प्रेम आहे तिथे सौंदर्य आहे. सत्यम, शिवमसोबत परमात्माचे तिसरे वैशिष्ट्य सुंदरम असल्याचे सांगण्यात आले आहे. ते सुंदरच नाही पण सौंदर्यांचा मुळ स्त्रोत त्याचे अस्तित्व, सौंदर्य शाश्वत आहे. जग त्या सौंदर्याचे प्रत्यक्ष दिग्दर्शन आहे. शाश्वत सौंदर्याचे कलम त्यातूनच प्रस्फुटित होऊन सर्व जड–चेतनात सौंदर्य अभिसिंचन करते. वैदिक दर्शनानुसार रूपम रूपम प्रतिरूपो बभूव म्हणजे प्रकृतीची अव्यक्त अवस्था दर्पण आहे ज्यात चैतन्य ज्योतीचा आभास होतो. जितके मूर्त रूप आहेत ते सर्व त्या परब्रह्मरूपी ज्योतीचे प्रतिबिंब आहेत. त्याच एक परमात्म्याच्या परम ज्योतीने सुर्य व चंद्र प्रकाशमान आहेत. रात्र आपल्या असंख्य नेत्ररूपी ताऱ्यांनी त्या सौंदर्याचे दर्शन करते. परमात्म्याच्या अंश असल्याच्या नात्याने जीवात्मा सुद्धा प्रत्येक सुंदर वस्तुकडे आकर्षित होतो. प्रकृतीचे मनोरम दृश्य, हिरवळ, फुलांचे उद्यान, नदी, पर्वत इत्यादी पाहून कुणाचे मन फ ु लणार नाही? सौंदर्याकडे आकर्षण अंतरतम्ची अभिव्यक्ती आहे, जी शाश्वत सौंदर्याचा शोध घेते. कबीर त्या शाश्वत सौंदर्याला चोहीकडे पाहतात– लाली मेरे लाल की, जित देखौं तित लाल। सौंदर्य प्रेमींनी त्या सौंदर्यास नारीत पाहिले व त्यात ब्रह्माची कल्पना केली. असे मधुर व कोमल अवलंबन ब्रह्माव्यतिरिक्त दुसरे कुणीही असू शकत नाही कारण ते प्रेमरूप आहे, परम सुंदर आहे व त्याचे सौंदर्य विश्वाच्या चराचरात आहे. त्या दिव्य सौंदर्याचा साक्षात्काराने अज्ञानरूपी अंधार नष्ट होतो, जन्म–जन्माचे पाप धुतले जातात. प्रेम मिळवण्यासाठीच ब्रह्माने सृष्टीची रचना केली व जीवाच्या हृदयात प्रेम निर्माण केले. एकीकडे हे प्रेम साधकाच्या हृदयातील सर्व कलुषित भावना, वासना व आकांक्षा नष्ट करुन हृदय स्वच्छ करते. दुसरीकडे त्याच्या हृदयास त्या अनंत सौंदर्य रसाने परिपूर्ण करते. प्रेम खऱ्या प्रेमीस कधीच थकू देत नाही. ते त्यास नित्य नवीन शाश्वत सौंदर्याची अनुभूती करुन देत राहते.

## उपदेशकथा

### अजरामर

बोधीसत्त्वांचा एक शिष्य होता. बोधीसत्वांनी त्याला आज्ञा केली, 'तू तुझे नाव अजरामर कर'. शिष्याने त्याचे नाव समुद्रकिनाऱ्यावर वाळूत कोरले. परंतु समुद्राला भरती येताच ते नाव लाटेबरोबर वाहून गेले. मग नंतर त्याचे नाव झाडाच्या बुंध्यावर कोरले. काही दिवसांनी एका लाकूडतोड्याने ते झाड तोडले. त्याची लाकडे जाळण्यासाठी वापरली. त्यामुळे नाव जाळले गेले. शिष्याने खूप विचार केला व मोठ्या कष्टाने नाव एका खडकावर कोरले त्याला वाटले आता मात्र नाव अजरामर होणार. पण त्याचे खडकावरचे नावही गेले. कारण अचानक भूकंप झाला व खडक जमिनीत गाडला गेला. तेव्हा मात्र शिष्याचा धीर खचला. निराश मनाने तो बोधीसत्वांकडे गेला व म्हणाला, 'मी खूप प्रयत्न केले पण माझे नाव अजरामर झाले नाही. मला आता काय केले पाहिजे म्हणजे नाव कायमचे राहील? मला मार्ग सांगा' बोधीसत्व म्हणाले, 'तू असे मार्ग हाताळलेस की जे कायम राहणारच नव्हते. जे कायमस्वरूपी राहते ते फक्त जगासाठी केलेले चांगले कार्य. त्या कार्यामुळे तुझे नाव माणसांच्या हृदयावर कोरले जाईल. तिथून मात्र ते कधीच पुसले जाणार नाही आणि त्यासाठी चांगले कार्य शोध व त्यातून तू नाव अजरामर कर' शिष्याने त्या दिवसापासून लोककल्याणाचे कार्य हाती घेतले.

कथा उपदेश : ध्येयाचा ध्यास लागल्यावर कामाचा त्रास वाटत नाही.

## पंचांग

| | |
|---|---|
| विक्रम संवत्– २०८२ | नक्षत्र:अश्विनी |
| वैशाखशके संवत्– १९४८ | ०९:४२:१७ |
| संवत्सर –पराभवनाम | योग:प्रीति २३:५५:३६ |
| अयन– उत्तरायणारंभ | करण:बव १४:१०:४९ |
| मास– वैशाख | करण:बालव |
| ॠतु– सौर वसंत | २४:३०:५१+ |
| शुक्ल पक्ष | सूर्य:मेष |
| तिथि:प्रतिपदा १४:१०:४९ | चन्द्र:मेष |

## दै. 'संध्या' धमाल सूडोकु क्र. १२२

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | 6 | | | 9 | |
| | 4 | 7 | | 8 | | 3 | 1 | |
| | 1 | | | 7 | 4 | 5 | | 2 |
| | | 5 | | | | | 2 | 7 |
| 2 | | | 9 | 3 | 7 | | | 5 |
| 4 | 7 | | | | | 1 | | |
| 6 | | 2 | 1 | 9 | | | 7 | |
| | 9 | 8 | | 4 | | 2 | 5 | |
| | 5 | | | 2 | | | | |

**: सूडोकु :**

खेळाचे नियम : प्रत्येक उभी लाइन, आडवी लाइन आणि ३–३ च्या वर्गात १ ते ९ पर्यंतची संख्या भरा. परंतु ही अट आहे की, नंबरची पुनरावृत्ति कोणत्याही उभ्या किंवा आडव्या लाइन आणि चौकानात आली नाही पाहिजे. प्रत्येक कोड्याचे केवळ एकच उत्तर आहे.या कोड्याला भरण्यासाठी आपण पेन्सिलचा आणि खोड रबराचा उपयोग केला तर ते आपल्यासाठी अधिक सुविधा जनक होईल.

– उत्तर उद्याच्या अंकात

**सूडोकु क्र. १२१ चे उत्तर**

| | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| 4 | 2 | 6 | 5 | 9 | 8 | 3 | 7 | 1 |
| 3 | 9 | 7 | 1 | 6 | 4 | 5 | 2 | 8 |
| 1 | 8 | 5 | 7 | 2 | 3 | 6 | 9 | 4 |
| 7 | 4 | 8 | 9 | 3 | 2 | 1 | 5 | 6 |
| 5 | 3 | 1 | 4 | 7 | 6 | 9 | 8 | 2 |
| 2 | 6 | 9 | 8 | 1 | 5 | 7 | 4 | 3 |
| 8 | 1 | 3 | 2 | 5 | 7 | 4 | 6 | 9 |
| 9 | 5 | 2 | 6 | 4 | 1 | 8 | 3 | 7 |
| 6 | 7 | 4 | 3 | 8 | 9 | 2 | 1 | 5 |

## इतिहासात आजचा दिवस

### आंतरराष्ट्रीय

- १५८७ – सर फ्रांसिस ड्रेकने केडिझच्या बंदरात स्पेनच्या आरमाराचा पराभव केला.
- १७७५ – अमेरिकन क्रांति – कॉंकॉर्ड व लेक्झिंग्टनची लढाई.
- १८१० – व्हेनेझुएलाने स्पेनपासून स्वातंत्र्य जाहीर केले.
- १८३९ – १८३९चा लंडनचा तह – बेल्जियम स्वतंत्र राष्ट्र म्हणून अस्तित्वात.
- १९०४ – कॅनडातील टोरोंटो शहर आगीत भस्मसात.
- १९०९ – जोन ऑफ आर्कला संत घोषित करण्यात आले.

### राष्ट्रीय

- १३६६ – विजयनगर साम्राज्याची स्थापना.
- १७२० – मसूर येते शाहूमहाराजांनी पहिल्या बाजीरावाला पेशवाईची वस्त्रे दिली.
- १८५९ – स्वातंत्र्यसमरातील सेनानी तात्या टोपे यांना ब्रिटिशांनी फाशी दिली.

### जन्म

- १३२० – पेद्रो पहिला, पोर्तुगालचा राजाचा जन्म.
- १४५२ – फर्डिनांड दुसरा, अरागोनचा राजाचा जन्म.
- १७९३ – फर्डिनांड पहिला, ऑस्ट्रियाचा राजाचा जन्म.
- १८८२ – गेतुइलो व्हार्गास, ब्राझिलचा पंतप्रधान याचा जन्म.
- १८९७ – पीटर दी नरोन्हा, भारतीय उद्योगपतीचा जन्म.
- १९०३ – इलियट नेस, अमेरिकन पोलिसचा जन्म.
- १९३३ – डिकी बर्ड, इंग्लिश क्रिकेटपंचाचा जन्म.

### निधन

- १०५४ – पोप लिओ नववा यांचे निधन.
- १३९० – रॉबर्ट तिसरा, स्कॉटलंडचा राजाचे निधन.
- १५७८ – उएसुगी केन्शिन, जपानी सामुराईचे निधन.
- १६८९ – क्रिस्टीना, स्वीडनची राणीचे निधन.

## : SMS :

Wife: jab aap chashma utaarte ho, bahut handsome dikte ho.
Husband: haa dear, jab main chashma utaarta hoo, tum bhi bahut khoobsoorat dikti ho.

## हवामानाचा अंदाज

| | | |
|---|---|---|
| औरंगाबाद | ३७ | २४.१ |
| अहमदनगर | ३७.५ | २२.४ |
| अकोला | ४० | २५.४ |
| अमरावती | ३९.४ | २४.१ |
| बीड | ४२ | २९.५ |
| भंडारा | ४२.३ | २७.५ |
| बुलढाणा | ३६.९ | १८.९ |
| चंद्रपूर | ४१.९ | ३२.१ |
| चेन्नई | ४५.२ | ३३.६ |
| नवी दिल्ली | ३७ | २४.३ |
| धुळे | ३७.१ | २०.५ |
| गोंदिया | ४१.२ | २५.८ |
| जळगाव | ४१.६ | २४.४ |
| कोल्हापूर | ३७.१ | २१.४ |
| लातूर | ३७.२ | २४.७ |
| मुंबई | ३६.६ | २९.५ |
| नागपूर | ४१.६ | २६.१ |
| नांदेड | ३९.६ | २५.१ |
| नंदूरबार | ३५.४ | २३.५ |
| नाशिक | ३६.२ | २०.४ |
| पुणे | ३५.४ | १९ |
| पंढरपूर | ३८.१ | २४.२ |
| सातारा | ३८.२ | १८.९ |
| सांगली | ३७.९ | २२.८ |
| सोलापूर | ३८.२ | २५.२ |
| वर्धा | ४२.६ | २४.३ |

## आजचे राशिभविष्य

**मेष :** शुभ रंग–हिरवा, शुभ दिशा– पूर्व प्रतिष्ठीत भेटी होतील. व्यापारात आपल्या निर्णयाचा फायदा मिळेल.

**तुळ :** शुभ रंग –पिवळा, शुभ दिशा –दक्षिण व्यवसायिक समस्या दूर होईल. मुलांची प्रगती राहील.

**वृषभ :** शुभ रंग–निळा, शुभ दिशा– पूर्व उत्पन्नापेक्षा जास्त खर्च करू नका. व्यापारिक संकटामुळे चिंता राहून धावपळ वाढणार आहे.

**वृश्चिक :** शुभ रंग–लाल, शुभ दिशा–पश्चिम बुद्धीमत्तेवर अनेक समस्या दूर होतील. अचानक धनप्राप्ती होण्याचा योग आहे. प्रिय व्यक्तिची गाठ होईल.

**मिथुन :** शुभ रंग– हिरवा – शुभ दिशा– पूर्व आर्थिक स्थिती चांगली राहिल्याने मन आनंदी राहील. कौटुंबिक चिंता दूर होऊ शकते.

**धनु :** शुभ रंग– गुलाबी, शुभ दिशा– पश्चिम मित्र किंवा सहकारी यांच्यावर जास्त विश्वास करू नका. मान प्रतीष्टा कमी होईल.

**कर्क :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा– पश्चिम जीवनसाथीच्या प्रगतीमुळे सामाजिक मान सन्मान वाढणार आहे.

**मकर :** शुभ रंग– लाल – शुभ दिशा– पूर्व अचानक धन मिळण्याची शक्यता आहे. व्यवसायीक वाद आपल्या प्रयत्नामुळे संपुष्टात येईल.


**सिंह :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा–दक्षिण व्यवहार कुशलतेमुळे अधिकारी खुष राहतील. वहान सुख मिळेल. आळस दूर करा.

**कुंभ :** शुभ रंग– पांढरा, शुभ दिशा– पूर्व प्रयत्न व दूरदर्शिपणा यामुळे आपल्याला इतरांकडून समर्थन मिळेल. आर्थिक स्थिती चांगली राहील.

**कन्या :** शुभ रंग– हिरवा, शुभ दिशा– दक्षिण कौटुंबिक सुख व पत्नीच्या सहयोगाने मन प्रसन्न राहील. स्वाध्यायात गोडी वाटेल.

**मीन :** शुभ रंग– पिवळा, शुभ दिशा– दक्षिण व्यापारातील हेतु साध्य होण्याकरिता प्रयत्न करावे लागतील. आकर्षक प्रस्ताव आपल्याला येतील.

## 'दै. संध्या' जम्बो शब्दकोडे क्र. १२२



**आडवे शब्द**

२. शासकीय
५. समुद्रमंथन करणारा नाग
८. मोत्यांचे कर्णभूषण
९. विवाह
१०. तसे असो (आशीर्वचन)
११. दुसऱ्यासाठी शब्द टाकणे, भीड
१३. एकाग्र नजर
१४. चामखीळ
१५. विज्ञान
१६. शास्त्राचा घाव, आठवड्याचा दिवस
१७. सरिता
१९. विलंब
२०. मित्र
२२. प्रभाव
२६. अपात्र
२९. कंटाळा
३०. कुलू–मनाली या राज्यात आहे
३२. परवानगी, परवानगीने घेतलेली सुट्टी
३४. एक शेंगभाजी
३५. पळवून नेणे
३६. उथळ, अभिरुचीहीन
३८. बक
३९. छत
४०. मेंदूभोवतीचे हाडांचे कवच
४१. सहल, प्रवास
४२. विविध
४४. पुष्ट
४६. प्रसंगावधान
४९. स्वार्थी
५१. संन्याशाची पादत्राणे
५३. वाचक
५४. डझन
५६. मत्सर
५७. ज्वारीचा पदार्थ
५९. पायताण
६०. लाल
६३. हेकट
६४. तुफान
६५. प्रेम असे असते म्हणतात!
६६. गाढव (संस्कृत)
६८. रस्ता
६९. काविळ
७१. गुळाच्या ढेपेला चिकटणारा
७२. लहान मुलीचे कर्णभूषण
७३. पक्का
७४. चिमुकला
७५. बाण
७७. डोशाचा एक प्रकार
७८. अल्पकाळ टिकणारा भाजीपाला इ.
७९. अत्तराचा बोळा

**उभे शब्द**

१. तांबड्या रंगाचे एक रत्न
२. सोशिक
३. वाळवंट, युद्धभूमी
४. पद्धतशीर
५. वास्तुच्या रचनेचे प्राचीन तंत्र
६. पोपट
७. बातमी
८. खानदानी
९. कौशल्य
१२. डॉक्टरच्या व्यवसायाची जागा
१८. केविलवाणा
१९. उलगडा
२१. आवडता
२२. आकाश
२३. दर्जाहीन
२४. पश्चिम बंगालची राजधानी
२५. संशय
२७. बडगा
२८. नारळाचे कवच
३०. थंडीचा ऋतु
३१. लाज
३३. जागृतावस्था
३४. नभ
३६. कामचुकारांना हा हक्क वाटतो
३७. संकट, विपदा
३८. वितरण
३९. गजानन
४०. शपथ (हिंदी)
४२. नावापुरता, अधिकारहीन
४३. अग्र
४५. ताकीद
४७. थट्टेखोर
४८. नियंत्रण, कबजा
५०. संपत्ती
५१. दुधाचा घट्ट पदार्थ
५२. चुका दाखवून जहाल टीका, कानउघडणी करणे
५५. रात्री न दिसणारा
५६. धर्मेंद्रची पत्नी
५८. लेखणी
५९. खेद वाटावा असे
६१. गाढ झोप
६२. मोह
६५. कर्णाचे राज्य
६७. टोचणी
७०. वासना, इच्छा
७५. शंभर
७६. कृती

**जम्बो शब्दकोडे क्र. १२१ चे उत्तर**

आडवे उत्तर ८.मास १०. ने मजसी ने परत मातृभूमीला सागरा १६.मार १७.बायको १९.वटवट २०.अनवरत २२.मजा २३.कलश २४.चाल २५.गवा २७.तास ३०.गूढ ३१.सफेद ३३.अंगना ३५.बंडलबाज ३८.बाळबोध ४०.वास ४१.साफसफाई ४४.सुर ४६.नथ ४८.रबर ४९.मनकवडा ५१.कलंक ५३.कट्टी ५५.कीव ५७.गवगवा ६०.इजा ६१.वपा ६३.रणरण ६४.नग ६५.श्रीमंत ६६.तरबेज ६८.नट ७०.धबधबा ७१.नीला ७३.कवडीचुंबक ७७.लगबग ७८.पक्षी ८१.भरवसा ८२.रत ८३.सटरफटर

उभे उत्तर : १.सोनेरी २.आंजनेय ३.सिनेमा ४.जोर ५.सीमा ६.प्रभू ७.पेला ८.माग ९.सराव ११.परवशता १२.तफावत १३.तृण १४.मीलन १५.सासुरवास १७.बाजारगप्प १८.कोकम २०.अलगूज २१.वग २६.गोंद २८.सबंध २९.हलवा ३२.फेरफार ३४.गळ ३६.बास ३७.सफर ३८.बारव ३९.बोट ४२.सबब ४३.कमकुवत ४४.सुकर ४५.पलंग ४७.थकवा ५०.डाकीण ५२.कवन ५४.आजानुबाहू ५६.वरई ५८.गगनचुंबी ५९.समंध ६२.पारखा ६३.रजनी ६५अ.तबक ६७.अवगत ६९.टब ७२.लाल ७३.कबर ७४.कपट ७५.दंभ ७६.राव ७९.क्षीर ८०.सूट

RNI No. 1663/1957 (DAILY SANDHYA) |
दैनिक संध्या पब्लिकेशन्स प्रा. लि. यांच्या मालकीचे हे दैनिक मुद्रक व प्रकाशक ज्योती नाळे यांनी सामना प्रेस (प्रबोधन प्रकाशन) सिंहगड रोड, वडगांव खुर्द पुणे–४११०४१ येथे छापून, १०३८ आकार भवन, दुसरा मजला, टिळक रोड, पुणे – ४११००२ येथे प्रसिद्ध केले.
संपादिका : ज्योती नाळे (पी.आर.बी. कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी.) (फोन : ०२०–२४४७९२९२)
Daily "Sandhya" News paper is owned by Dainik Sandhya Publications Pvt. Ltd. Printed & Published by Jyoti Nale, Printed at Saamana Press (Prabodhan Prakashan) Pvt. Ltd. Sihagad Road, Vadgaon Khurd, Pune 411 041, published at 1038, Aakar Bhavan, Tilak Road, Pune 411002. Editor - Jyoti Nale.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### कलामहर्षी डी. एस. खटावकर पथ फलकाचे अनावरण

पुणे (दैनिक संध्या) : नगरसेविका स्वप्नाली नितीन पंडित यांच्या निधीतून साकारण्यात आलेल्या 'कलामहर्षी डी. एस. खटावकर पथ' फलकाचे अनावरण तुळशीबाग रस्ता, गणपती चौक येथे उत्साहात पार पडले. याचे उद्घाटन ज्येष्ठ मूर्तिशास्त्र अभ्यासक डॉ.गो. बं. देगलूरकर यांच्या हस्ते झाले. यावेळी आमदार हेमंत रासने यांची प्रमुख उपस्थिती होती. त्यांच्यासोबत नगरसेवक राघवेंद्र मानकर, कुणाल टिळक, स्वरदा बापट, उदय लेले, माजी नगरसेवक राजेश येनपुरे, आयोजक नगरसेविका स्वप्नाली पंडित, विवेक खटावकर, नितीन पंडित, विकास पवार, राजेंद्र धावडे, विनायक कदम, दत्ताभाऊ कावरे, मोहन साखरिया, सागर दहीभाते, अरविंद तांदळे, जीवन हेंद्रे, किरण चौहान आदी मान्यवर उपस्थित होते. डी.एस. खटावकर यांचे नाव पुण्याच्या गणेशोत्सवाशी अविभाज्यपणे जोडले गेले आहे. विशेषतः तुळशीबाग सार्वजनिक गणेशोत्सव मंडळासाठी त्यांनी सलग ५५ वर्षे मूर्तिकार आणि सजावटकार म्हणून काम केले. मानाच्या गणपतींसह हत्ती गणपती, अखिल मंडई मंडळ आणि भाऊ रंगारी गणपती यांसारख्या मोठ्या मंडळांच्या विसर्जन मिरवणुकीतील भव्य चित्ररथ हे त्यांच्या कलेचे जिवंत नमुने होते. नगरसेविका स्वप्नाली पंडित म्हणाल्या, पुण्याच्या सार्वजनिक गणेशोत्सवाला आणि कला क्षेत्राला आपल्या कल्पकतेने एका वेगळ्या उंचीवर नेऊन ठेवणारे ज्येष्ठ शिल्पकार व चित्रकार दत्तात्रेय श्रीधर उर्फ डी. एस. खटावकर यांचा जीवनप्रवास आजही नव्या पिढीच्या कलाकारांसाठी दीपस्तंभ ठरत आहे. 'कला महर्षी' ही पदवी सार्थ करणाऱ्या खटावकर सरांनी आपल्या सहा दशकांच्या कारकिर्दीत केवळ मातीच्या मूर्तीच घडवल्या नाहीत, तर कलेच्या माध्यमातून महाराष्ट्राची संस्कृती घराघरांत पोहोचवली. अशा थोर व्यक्तिमत्त्वाच्या स्मरणार्थ या पथाला त्यांचे नाव देणे हा आमच्यासाठी अभिमानाचा आणि सन्मानाचा क्षण आहे.




### डॉ. कामठे पाईल्स क्लिनिकला एटॅबची मान्यता

पुणे (दैनिक संध्या) : आयुर्वेदिक प्रशिक्षण व प्रॉक्टोलॉजी क्षेत्रातील उच्च दर्जाच्या कार्याची दखल घेत डॉ. कामठे पाईल्स क्लिनिक, पुणे यांना क्षारकर्म, अग्निकर्म व क्षारसूत्र अभ्यासक्रमांना अधिकृत परवानगी देण्यात आली आहे. आयुर्वेदा ट्रेनिंग अ‍ॅक्रेडिटेशन बोर्ड (एटॅब), राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठ, आयुष मंत्रालयाकडून अधिकृत मानांकन प्रमाणपत्र प्राप्त झाले आहे. या मान्यतेमुळे संस्थेला आता क्षारकर्म व अग्निकर्म (आधुनिक दृष्टिकोनासह) तसेच क्षारसूत्र या विषयांतील प्रमाणपत्र अभ्यासक्रम चालविण्याची अधिकृत परवानगी मिळाली आहे. विशेषतः क्षारसूत्र अभ्यासक्रम हा तीन महिन्यांचा हायब्रिड स्वरूपात राबविण्यात येणार असून, विद्यार्थ्यांना सैद्धांतिक व प्रात्यक्षिक अशा दोन्ही प्रकारचे प्रशिक्षण मिळणार आहे. उत्तर प्रदेशमधील वाराणसी येथे झालेल्या कार्यक्रमात आयुषचे राज्यमंत्री प्रतापराव जाधव, सचिव राजेश कोटेचा, एनसीआयएसएम अध्यक्षा मनीषा कोठेकर, राष्ट्रीय आयुर्वेद विद्यापीठाचे अध्यक्ष देवेंद्र त्रिगुणा हे उपस्थित होते. डॉ. कुणाल कामठे म्हणाले, प्रॉक्टोलॉजी विषयात शिक्षण घेऊन प्रत्यक्ष प्रॅक्टिस करू इच्छिणाऱ्या डॉक्टरांसाठी ही एक उत्तम संधी असून, या अभ्यासक्रमांद्वारे एटॅब मान्यताप्राप्त प्रमाणपत्र मिळणार आहे. आयुष क्षेत्रातील डॉक्टरांनी या संधीचा लाभ घेत आयुर्वेदिक प्रॉक्टोलॉजिस्ट म्हणून प्रगत प्रशिक्षण घेण्याचे आवाहन त्यांनी केले. आयुष डॉक्टर झाल्यानंतर अनेकांना प्रॉक्टोलॉजी ची प्रॅक्टीस करायची असते. परंतु यासाठी चांगल्या प्रशिक्षण केंद्राची गरज असते. हे चांगले प्रशिक्षण केंद्र आम्ही उपलब्ध करून देत आहोत. भारत सरकारच्या आयुष मंत्रालयाची मान्यता असणार हा कोर्स आहे. त्यामुळे आयुष मान्यताप्राप्त असणाऱ्या या कोर्सचा अधिकाधिक लोकांनी लाभ घ्यावा.




### जातीयवादाचा काटेरी साखळदंड भारताला पुढे जाऊ देणार नाही

पुणे (दैनिक संध्या) : जातिवाद हा भयंकर मोठा शत्रू आहे. इतर जाती विषयीचा द्वेष आपण निश्चितच कमी करू शकतो. आंतरजातीय विवाह हा त्यातला एक चांगला मार्ग आहे. आंतरजातीय विवाहांना प्रोत्साहन दिले पाहिजे तर काही प्रमाणात जातीवादाचा आपण पराभव करू शकू. जातीयवाद भारताला संपावाच लागेल नाहीतर हा काटेरी साखळदंड भारताला पुढे जाऊ देऊ शकत नाही, असे मत व्याख्याते निलेश धायरकर यांनी व्यक्त केले. भारतरत्न डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या जयंतीनिमित्त नऱ्हे येथील जाधवर ग्रुप ऑफ इन्स्टिटयूटस् तर्फे सहावी भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर ऑनलाईन व्याख्यानमाला आयोजित करण्यात आली. यामध्ये ते बोलत होते. संस्थेचे उपाध्यक्ष उपाध्यक्ष अ‍ॅड.शार्दुल जाधवर यांच्या मार्गदर्शनाखाली या व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले. निलेश धायरकर म्हणाले, फुटीरतावाद हा देखील गंभीर प्रश्न देशासमोर आहे. संविधान विरोधी काम करणाऱ्या, शस्त्र हातात घेऊ पाहणाऱ्या, जातीच्या संघटना बांधणाऱ्या ठिकाणी आपण सक्रिय नसले पाहिजे, तरच आपण प्रखर राष्ट्रवादी आहोत. इस्लामिक राष्ट्रवाद देखील आपल्याला आव्हान देत आहे. आपण सगळ्यांनी डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांचा राष्ट्रवाद अंगीकारला पाहिजे आणि तो अधिक उच्चतम स्थानी न्यायला पाहिजे, असेही त्यांनी संगितले.

# ७२ तासांनंतरही बंडगार्डन पोलिसांचा गुन्हा दाखल करण्यास नकार

## उपायुक्तांच्या आदेशाला केराची टोपली, राहुल डंबाळे उच्च न्यायालयात धाव घेणार

**पुणे (दै. संध्या)**

भारतरत्न डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त ससून रुग्णालयासारख्या 'सायलेन्स झोन'मध्ये डीजेचा धणधणाट करून कायदाभंग करणाऱ्यांवर कारवाई करण्यात बंडगार्डन पोलीस अपयशी ठरले आहेत. पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांनी गुन्हा दाखल करण्याचे स्पष्ट आदेश पोलीस निरीक्षकांना दिले असतानाही, ७२ तास उलटूनही बंडगार्डन पोलिसांनी कोणतीही कारवाई केलेली नाही. पोलिसांच्या या जाणीवपूर्वक दुर्लक्षाविरोधात मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात दाद मागणार असल्याची माहिती सामाजिक कार्यकर्ते राहुल डंबाळे यांनी दिली आहे.

वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या आदेशाची पायमल्ली

राहुल डंबाळे यांनी दिलेल्या माहितीनुसार, ससून रुग्णालय परिसरात झालेल्या नियमांच्या उल्लंघनाबाबत त्यांनी पोलीस उपायुक्त राजलक्ष्मी शिवणकर यांची भेट घेतली होती. यावेळी शिवणकर यांनी "संबंधित प्रकरणावर गुन्हा दाखल करण्याचे आदेश बंडगार्डन पोलीस निरीक्षकांना यापूर्वीच दिले आहेत" असे स्पष्ट केले होते.



मात्र, वरिष्ठांचे आदेश होऊनही स्थानिक पोलीस प्रशासन या प्रकरणाकडे जाणीवपूर्वक डोळेझाक करत असून दोषींना पाठीशी घालत असल्याचा आरोप डंबाळे यांनी केला आहे. ७२ तासांपासून कारवाईची प्रतीक्षा जयंती उत्सवादरम्यान झालेल्या आवाजाच्या मर्यादेबाबत १२ एप्रिलपासून सातत्याने पाठपुरावा करण्यात येत आहे. ७२ तास उलटूनही बंडगार्डन पोलीस गुन्हा दाखल करण्यास टाळाटाळ करत आहेत. "एकीकडे भीमसेवा प्रतिष्ठानने ३० फुटी बुद्धमूर्ती उभारून आणि डीजेला फाटा देऊन शांततेत अभिवादन करण्याचा आदर्श जपला, तर दुसरीकडे पोलीस प्रशासन कायदा मोडणाऱ्यांवर कारवाई करण्यास टाळाटाळ करून वैचारिक उत्सवाला गालबोट लावत आहे," अशी भावना डंबाळे यांनी व्यक्त केली.

**मंगळवारी उच्च न्यायालयात याचिका**

बंडगार्डन पोलिसांच्या या निष्क्रियतेची आणि वरिष्ठांच्या आदेशाचा अवमान केल्याची गंभीर दखल घेत, राहुल डंबाळे यांनी आता न्यायालयीन लढाईचा पवित्रा घेतला आहे. येत्या मंगळवारी मुंबई उच्च न्यायालयात या प्रकरणी याचिका दाखल केली जाणार आहे. यामध्ये दोषी मंडळांसोबतच, ७२ तास उलटूनही गुन्हा दाखल न करणाऱ्या आणि कर्तव्यात कसूर करणाऱ्या पोलीस अधिकाऱ्यांवर कारवाई करण्याची मागणी केली जाणार आहे.


# ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांची आर्थिक कोंडी

## तुटपुंजा पगार आणि अनुदानवाढ रखडल्याने संताप; आंदोलनाचा इशारा

**पुणे (दै. संध्या)**

राज्यभरात 11 हजार 150 सार्वजनिक ग्रंथालये आहेत. त्यात सुमारे 20 हजार 321 कर्मचारी काम करत असून, तुटपुंजे वेतन आणि तेही वेळेवर मिळत नसल्याने ग्रंथालयीन कर्मचारी आर्थिक अडचणीत सापडले आहेत. शहरी असो वा ग्रामीण भागातील कर्मचाऱ्यांची हीच परिस्थिती आहे.

ग्रंथालयांच्या अनुदानात 40 टक्के वाढीची घोषणा होऊनही अद्याप त्याची अंमलबजावणी न झाल्यामुळे ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांच्या अडचणी आणखी वाढल्या आहेत. ग्रंथालयाचे अनुदान वाढ आणि कर्मचाऱ्यांच्या वेतनवाढीकडे सरकारने दुर्लक्ष केल्याचे ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांसाठी काम करणाऱ्या संस्थांमधील



प्रतिनिधींचे म्हणणे आहे.

आताच्या घडीला राज्यातील सार्वजनिक ग्रंथालये आर्थिक अडचणीत आहेतच. पण, कमी वेतनामुळे काही कर्मचाऱ्यांनी तर नोकरी सोडण्याचा निर्णय घेतला आहे. काहीजण दुसरीकडे काम मिळत नसल्याने नाइलाजाने हीच नोकरी करत आहेत. ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना ग्रंथालयाच्या दर्जानुसार मिळणाऱ्या अनुदानातून वेतन दिले जाते.

मात्र, गेल्या काही वर्षांमध्ये ग्रंथालयांचा दर्जा बदल झालेला नाही. मध्यंतरी ग्रंथालयाच्या अनुदानात 40 टक्के वाढीची घोषणा करण्यात आली. यातून दिलासा मिळेल, असे ग्रंथालय प्रशासन आणि ग्रंथालयीन कर्मचाऱ्यांना वाटले होते. परंतु अद्यापही या निर्णयाची अंमलबजावणी न झाल्याने कर्मचाऱ्यांच्या आर्थिक अडचणी आणखी वाढल्या आहेत. याविषयी महाराष्ट्र सार्वजनिक ग्रंथालय कर्मचारी विकास परिषदेचे अध्यक्ष सदाशिव बेडगे म्हणाले, केरळ, कर्नाटक आणि गोवा सरकारकडून तेथील ग्रंथालय कर्मचाऱ्यांना दरमहा 25 हजार रुपये वेतन दिले जाते. मग, महाराष्ट्रात असे निर्णय का होत नाहीत. आम्ही ग्रंथालयांचे अनुदान वेळेवर द्यावे आणि इतर मागण्यांसाठी गेल्या काही वर्षांपासून पाठपुरावा करत आहोत. पण, सरकार त्याकडे दुर्लक्ष करत आहे. ग्रंथालय कर्मचाऱ्यांच्या मागण्यांसंदर्भात लवकर निर्णय न घेतल्यास जून महिन्यात पावसाळी अधिवेशनात आझाद मैदान ते विधान भवनवर मोर्चा काढणार आहोत.

# भूमी अभिलेख कर्मचाऱ्यांची दुपारच्या विश्रांतीची मागणी

**पुणे (दै. संध्या)**

एप्रिल व मे महिन्यातील वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर राज्यातील भूमी अभिलेख विभागातील मोजणी कामे दुपारच्या वेळेत बंद ठेवावीत, अशी मागणी राज्यातील भूमी अभिलेख विभागातील संघटनांच्या वतीने करण्यात आली आहे.

हवामान विभागाने या कालावधीत उष्णतेचा तीव इशारा दिल्यामुळे कामगारांच्या आरोग्याचा प्रश्न निर्माण झाला आहे. राज्यातील वाढत्या उष्णतेचा विचार करून शासनाने आधीच कामगारांसाठी दुपारच्या विश्रांतीच्या वेळा जाहीर केल्या आहेत. या निर्णयाचे स्वागत होत असतानाच, भूमी अभिलेख विभागातील कर्मचाऱ्यांनाही याचा लाभ देण्याची गरज व्यक्त केली जात आहे.

भूमी अभिलेख विभागातील कर्मचारी दररोज भरउन्हात शेतजमिनी व नगर भूमापनाशी संबंधित मोजणीची कामे करतात. ग्रामीण भागात ही कामे तीन ते चार किलोमीटर अंतरावर करावी लागतात. एकदा मोजणीचे काम सुरू झाल्यानंतर ते पूर्ण होईपर्यंत थांबवणे शक्य नसल्याने कर्मचाऱ्यांना तीव उन्हाचा सामना करावा लागतो.

सध्या विभागातील कर्मचाऱ्यांना दररोज दोन वेगवेगळ्या गावांमध्ये मोजणीची कामे पूर्ण करण्याचे उद्दिष्ट दिले जाते. या गावांमधील अंतर साधारण 30 ते 40 किलोमीटर असल्याने सकाळी 8 ते सायंकाळी 6 या कालावधीत त्यांना बाहेरच काम करावे लागते.

# जांभूळवाडी तलावावर भीम गीतांचा गजर; भव्य मिरवणुकीने परिसर दणाणला

**पुणे (दै. संध्या)**

डॉ. बाबासाहेब आंबेडकर जयंतीनिमित्त विश्वरत्न फाउंडेशनच्या वतीने जांभूळवाडी तलाव परिसरात आयोजित करण्यात आलेल्या विविध कार्यक्रमांना नागरिकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला. १२ एप्रिल रोजी भीम गीतांच्या कार्यक्रमाने उत्सवाची दमदार सुरुवात झाली असून, परिसरात उत्साहाचे वातावरण निर्माण झाले होते. १४ एप्रिल रोजी सकाळी सामूहिक वंदना उत्साहात पार पडली. यामध्ये लहान मुलं व युवकांनी उत्स्फूर्त सहभाग घेत आपल्या विचारांचे प्रभावी सादरीकरण करत उपस्थितांची मने जिंकली. या प्रसंगी मधुकर जाधव यांनी प्रबोधनपर मार्गदर्शन केले, तर संस्थापक अध्यक्ष नरेंद्र भाऊ पारखे यांनी उपस्थितांना प्रेरणादायी विचार देत उत्साह वाढवला. कार्यक्रमाच्या यशस्वी आयोजनात नरेंद्र भाऊ पारखे यांचे विशेष योगदान राहिले असून, त्यांच्या कार्याचे उपस्थितांकडून विशेष कौतुक करण्यात आले. कार्यक्रमाला परिसरातील नागरिक, महिला व लहान मुलांचा मोठ्या प्रमाणावर सहभाग लाभला. संध्याकाळी साडेपाच वाजता काढण्यात आलेल्या भव्य मिरवणुकीने संपूर्ण परिसर दणाणून गेला. आकर्षक रथ, दमदार साऊंड सिस्टिम आणि जयभीमच्या घोषणांनी वातावरण भारावून गेले. नागरिकांनी मोठ्या संख्येने सहभाग नोंदवत मिरवणुकीला उत्स्फूर्त प्रतिसाद दिला. हा उत्सव संस्थापक अध्यक्ष नरेंद्र भाऊ पारखे यांच्या मार्गदर्शनाखाली पार पडला. अध्यक्ष मधुकर लोखंडे, कार्यकारी अध्यक्ष सुभाष खडसे आणि उत्सव प्रमुख प्रभाकर शेंडगे यांच्या नेतृत्वाखाली कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन करण्यात आले. तसेच मिलिंद लोखंडे, नितीन ओव्हाळ, प्रकाश साळवी, निलेश जाधव, सुनील कांबळे, विलास जाधव आणि रवी जाधव यांनी कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी मोलाचे योगदान दिले.

# पुण्यात इमारत पाडकामासाठी नवे कडक नियम; नियमावली जाहीर

**पुणे (दै. संध्या)**

शहरात वाढत असलेल्या पुनर्विकास प्रकल्पांच्या पार्श्वभूमीवर जुन्या इमारतींच्या पाडकामासाठी आता कडक नियम लागू करण्यात आले. पाडकामाची प्रक्रिया अधिक सुरक्षित, पारदर्शक आणि शिस्तबद्ध करण्यासाठी पुणे महापालिकेने प्रथमच सविस्तर नियमावली जाहीर केली आहे.

महापालिका आयुक्त नवल किशोर राम यांनी या नव्या नियमांची घोषणा केली. त्यानुसार, कोणतीही इमारत पाडण्यापूर्वी संबंधित



विभागांची पूर्वपरवानगी घेणे तसेच आवश्यक माहिती प्रशासनाला सादर करणे बंधनकारक आहे. संबंधित सोसायट्यांनी शेजारील इमारतींचे अध्यक्ष व सचिव यांचे संपर्क क्रमांक, तसेच अग्निशमन दल, पोलिस, महावितरण आणि एमएनजीएलच्या अधिकाऱ्यांची माहिती देणे आवश्यक राहणार आहे.

कर संकलन आणि पाणीपुरवठा विभागाकडून ना हरकत प्रमाणपत्र घेणे अनिवार्य केले आहे. पाडकामामुळे शेजारील इमारतींना धोका निर्माण होण्याची शक्यता असल्यास त्या इमारती पूर्णपणे रिकाम्या करण्याची जबाबदारी विकसक आणि संबंधित सोसायट्यांवर टाकण्यात आली आहे.

# 'टीईटी'च्या अर्जासाठी मुदतवाढ; 24 एप्रिलपर्यंत भरता येणार

## उमेदवारांना मोठा दिलासा मिळाला आहे; 21 जून रोजी परीक्षा घेतली जाणार

**पुणे (दै. संध्या)**

महाराष्ट्र राज्य परीक्षा परिषदेने शिक्षक पात्रता परीक्षा अर्थात टीईटी परीक्षेचे अर्ज भरण्यासाठी मुदतवाढ दिली आहे. त्यानुसार उमेदवारांना 24 एप्रिलपर्यंत अर्ज भरता येणार आहे.

परीक्षा परिषदेने 25 मार्चला टीईटीचे वेळापत्रक जाहीर केले. त्यानुसार 21 जून रोजी परीक्षा घेतली




जाणार आहे. या परीक्षेचे ऑनलाईन अर्ज भरण्यासाठी 27 मार्च ते 16 एप्रिलपर्यंतची मुदत देण्यात आली होती. मात्र, उमेदवारांनी अर्ज भरण्यास मुदतवाढ देण्याची विनंती परीक्षा परिषदेकडे केली होती.

या पार्श्वभूमीवर,परीक्षा परिषदेने अर्ज भरण्यासाठीची मुदत 24 एप्रिलपर्यंत वाढविण्यात आली आहे. टीईटी परीक्षेचा अर्ज करणाऱ्या उमेदवारांना 9 जून ते 21 जूनदरम्यान प्रवेश अर्जाची मुद्रित प्रत उपलब्ध करून दिली जाणार आहे.

# हुलावळे यांच्याकडे 'बांधकाम', तर नलावडे 'कृषी' सभापती

## विषय समित्यांचे वाटप; ६४ वर्षांच्या इतिहासात पहिल्यांदाच महिलेला बांधकाम सभापती पदाचा मान

**पुणे (दै. संध्या)**


पुणे जिल्हा परिषदेच्या विषय समित्यांच्या सभापती पदांचे गुरुवारी (दि. १६ एप्रिल) अधिकृतपणे वाटप करण्यात आले. यामध्ये मावळ तालुक्यातील दीपाली हुलावळे यांच्याकडे महत्त्वपूर्ण अशा बांधकाम व आरोग्य समितीची धुरा सोपवण्यात आली आहे, तर वेल्हे तालुक्यातील अमोल नलावडे यांची कृषी व पशुसंवर्धन समितीच्या सभापतीपदी वर्णी लागली आहे. जिल्हा परिषद अध्यक्ष वीरधवल जगदाळे यांनी विशेष सर्वसाधारण सभेत या निवडी जाहीर केल्या.

**महत्त्वपूर्ण खातेवाटप**

उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांच्याकडे अर्थ व नियोजन आणि शिक्षण या महत्त्वाच्या विभागांची जबाबदारी सोपवण्यात आली आहे. गुरुवारी झालेल्या बैठकीत तीन सभापतींना प्रत्येकी दोन विषय समित्यांच्या सभापती पदाची जबाबदारी देण्यात आली. नवनिर्वाचित चार सभापतींची निवड २ एप्रिल रोजीच झाली होती, मात्र त्यांना खात्यांचे वाटप होणे बाकी होते. अखेर गुरुवारी यावर शिक्कामोर्तब झाले.

**दीपाली हुलावळे यांनी रचला इतिहास**





जिल्हा परिषदेच्या ६४ वर्षांच्या इतिहासात यंदा नवा विक्रम प्रस्थापित झाला आहे. १९६२ मध्ये जिल्हा परिषदेची स्थापना झाल्यापासून आजतागायत एकाही महिला सदस्याला बांधकाम व आरोग्य समितीच्या सभापतीपदी संधी मिळाली नव्हती. खडककाळे जिल्हा परिषद गटातून निवडून आलेल्या दीपाली हुलावळे यांना ही संधी देऊन जिल्हा परिषद प्रशासनाने महिलांना मोठे प्रतिनिधित्व दिले आहे. बांधकाम सभापती होण्याचा बहुमान मिळवणाऱ्या त्या पहिल्या महिला ठरल्या आहेत.

**अशी आहे नवी टीम**

विवेक वळसे-पाटील (उपाध्यक्ष): अर्थ, नियोजन आणि शिक्षण विभाग. दीपाली हुलावळे: बांधकाम आणि आरोग्य समिती. अमोल नलावडे: कृषी आणि पशुसंवर्धन समिती. अंकिता पाटील-ठाकरे: महिला व बालकल्याण समिती (पूर्वीच निवड). जितेंद्र बडेकर: समाजकल्याण समिती (पूर्वीच निवड).

अध्यक्ष वीरधवल जगदाळे आणि उपाध्यक्ष विवेक वळसे-पाटील यांची यापूर्वीच बिनविरोध निवड झाली होती. गुरुवारपर्यंत उपाध्यक्ष व अन्य दोन पदाधिकारी बिनखात्याचे सभापती म्हणून कार्यरत होते.

या विशेष सभेला मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील, अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी चंद्रकांत वाघमारे आणि सर्व विभागांचे खातेप्रमुख उपस्थित होते. नवीन पदाधिकाऱ्यांच्या निवडीनंतर जिल्हा परिषदेच्या कामकाजाला आता अधिक गती मिळण्याची चिन्हे आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### महिला आरक्षण विधेयक देशाच्या भविष्याला दिशा देणारे ; मंत्री रक्षा खडसे

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : महिला आरक्षण विधेयक हे केवळ कायदेबदल नसून देशाच्या भविष्याला दिशा देणारे ऐतिहासिक आणि परिवर्तनकारी पाऊल आहे, असे प्रतिपादन केंद्रीय राज्यमंत्री रक्षा खडसे यांनी संसदेत बोलताना केले. हा केवळ विधेयकावरील वादविवाद नसून भारताच्या भविष्याचा निर्णायक क्षण असल्याचेही त्या म्हणाल्या. गुरुवारी संसदेत महिला आरक्षण विधेयकावर चर्चा करताना रक्षा खडसेंनी सावित्रीबाई फुले आणि महात्मा ज्योतिराव फुले यांच्या कार्याचा उल्लेख करत महिला शिक्षणाच्या पायाभरणीची आठवण केली. तसेच डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या विचारांचा संदर्भ देत महिलांच्या सन्मानाचे आणि अधिकारांचे महत्त्व अधोरेखित केले. त्या म्हणाल्या की, महिला सशक्त झाली तर संपूर्ण पिढी सशक्त होते. स्थानिक स्वराज्य संस्थांमध्ये ५० टक्के आरक्षणामुळे महिलांनी प्रभावी नेतृत्व सिद्ध केले. आता या विधेयकाद्वारे संसद आणि विधानसभांमध्ये महिलांचा सहभाग वाढवून धोरणनिर्मितीत त्यांचा आवाज अधिक प्रभावी करण्याचा प्रयत्न आहे, असेही त्या म्हणाल्या. रक्षा खडसेंनी स्वतःच्या ग्रामपंचायत सरपंच ते तीन वेळा लोकसभा सदस्य आणि मंत्री असा प्रवास सांगत महिलांमध्ये नेतृत्वाची प्रचंड क्षमता असल्याचे सांगितले. मंत्रालयांमध्ये महिलांचा सहभाग वाढल्याने प्रशासन अधिक सक्षम होत आहे. महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियांमध्ये महिलांची भूमिका आहे. महिलांना केवळ लाभार्थी नव्हे, तर देशाच्या विकासाच्या सूत्रधार म्हणून स्थान देणे आवश्यक आहे. 'विकसित भारत' संकल्पनेत महिलांची भूमिका निर्णायक असून सर्व सदस्यांनी या ऐतिहासिक विधेयकाला पाठिंबा द्यावा, असे आवाहन त्यांनी केले. २०१४ नंतर केंद्र सरकारने महिलांसाठी अनेक महत्त्वपूर्ण योजना राबवल्याचे सांगत त्यांनी 'बेटी बचाओ, बेटी पढाओ' योजनेचा विशेष उल्लेख केला. मुलींच्या शिक्षणात लक्षणीय वाढ झाल्याचे सांगत माध्यमिक स्तरावर नावनोंदणी सुमारे ७८ टक्क्यांपर्यंत पोहोचल्याचे त्यांनी नमूद केले. प्रधानमंत्री उज्वला योजना, प्रधानमंत्री जनधन योजना, प्रधानमंत्री आवास योजना अशा विविध योजनांमधून मिळवलेल्या उपलब्ध देखील सभागृहात मांडल्या. महिलांच्या आर्थिक सक्षमीकरणासाठी स्वयं-सहायता गटांशी सुमारे ११ कोटी महिलांना जोडण्यात आले असून मुद्रा योजनेद्वारे कर्जसुविधा उपलब्ध करून देण्यात आल्याचा उल्लेख त्यांनी केला. 'लखपती दीदी' उपक्रमाद्वारे महिलांना आत्मनिर्भर बनवण्याचा प्रयत्न सुरू असल्याचेही त्यांनी सांगितले.



### डॉक्टरांनी चक्क महिलेची मणक्याऐवजी केली मांडीची शस्त्रक्रिया! वृद्धेचा मृत्यू

वाराणसी (दैनिक संध्या) : उत्तर प्रदेशातील वाराणसी येथील प्रसिद्ध बनारस हिंदू विद्यापीठाच्या ट्रॉमा सेंटरमध्ये डॉक्टरांच्या अजब आणि भयंकर निष्काळजीपणामुळे एका 71 वर्षीय वृद्ध महिलेला आपला जीव गमवावा लागला आहे. मणक्याच्या ट्यूमरवर शस्त्रक्रिया करायची असताना डॉक्टरांनी चक्क महिलेच्या मांडीवर शस्त्रक्रिया केल्याचा आरोप कुटुंबीयांनी केला आहे. याप्रकरणी आता उच्चस्तरीय चौकशीचे आदेश देण्यात आले आहेत. अमृतपूर येथील राधिका देवी (वय 71) यांना मणक्याच्या ट्यूमरच्या त्रासामुळे 25 फेब्रुवारी रोजी बीएचयू रुग्णालयात दाखल करण्यात आले होते. डॉक्टरांच्या देखरेखीखाली त्यांच्यावर उपचार सुरू होते.

### दिल्लीचे नवे नायब राज्यपाल तरनजीत सिंग संधूंचे थेट ट्रम्प यांच्याकडून विशेष अभिनंदन

नवी दिल्ली (दैनिक संध्या) : अमेरिकेचे राष्ट्राध्यक्ष डोनाल्ड ट्रम्प यांनी दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती झाल्याबद्दल माजी राजदूत तरनजीत सिंग संधू यांचे अभिनंदन केले आहे. संधू हे एक 'अनुभवी राजनैतिक अधिकारी' असून त्यांच्या कार्यकाळात भारत आणि अमेरिका यांच्यातील संबंध अधिक दृढ होतील, असा विश्वास ट्रम्प यांनी व्यक्त केला आहे. डोनाल्ड ट्रम्प यांनी आपल्या 'ट्रुथ सोशल' या सोशल मीडिया प्लॅटफॉर्मवर संधू यांच्याबद्दल गौरवोद्गार काढले. ट्रम्प यांनी आपल्या पोस्टमध्ये म्हटले की, "दिल्लीच्या नायब राज्यपालपदी नियुक्ती झाल्याबद्दल तरनजीत सिंग संधू यांचे मनःपूर्वक अभिनंदन! एक अनुभवी राजनैतिक अधिकारी आणि अमेरिकेतील भारताचे माजी राजदूत म्हणून त्यांनी दोन्ही देशांमधील द्विपक्षीय संबंध मजबूत करण्यासाठी नेहमीच मोलाचे योगदान दिले आहे." दिल्लीच्या प्रगतीसाठी संधू यांचे नेतृत्व यशस्वी ठरेल, अशा शुभेच्छाही त्यांनी यावेळी दिल्या.

### जाहिर नोटीस

तमाम लोकांस विषेशतः गाव मौजे आलदरे, ता. जुन्नर, जि. पुणे आसपासचे तसेच जुन्नर तालुक्यातील सर्व लोकांना आमचे आशिलांनी सांगितलेवरून व दिलेल्या माहितीवरून या जाहीर नोटीसीने कळविण् यात येते की,

गाव मौजे आलदरे, ता. जुन्नर, जि. पुणे येथील गट ८/१/४, क्षेत्र-०.३०आर, आकार-०.६४, परिशिष्ट मिळकत ही श्री. बंडू सदाशिव कर्पे, श्री. मिलींद राजाराम झगडे, श्री. चेतन सुभाष खाटोकर यांचे सामाईक मालकी वहिवाटीची असून त्यांचेच नाव सातबारा उता-यावर दाखल आहे. आमचे आशिलांना सध्याचे विद्यमान मालकांनी वर वर्णन केलेले क्षेत्र खरेदी देण्याचे ठरविले आहे. त्याबाबत व्यवहाराची बोलणी जमिनीचे वरील मालकाबरोबर झालेली आहे. संबंधित जमीनीत इतर कोणाचाही हित हक्कसंबंध नसलेबाबत तसेच सदर जमीन निर्वेध, निजोखमी असल्याबाबत व कोणत्याही संपादनाचा भाग नसल्याबाबत आमचे आशिलांस त्यांनी खात्री दिली आहे. तरी सुध्दा या जाहीर नोटीसीने सर्वाना कळविण्यात येते की, वरील जमिनी संदर्भात कोणाचीही मालकी वहिवाट, बक्षिसपत्र, लीन, गहाण दान, लीज, भाडेपटटा, खरेदी विक्री, साठेखत वगैरे मार्गाने या अगोदर व्यवहार झाले असल्यास अथवा मालकी हक्क संदर्भातील कागदपत्रे तयार असल्यास त्या कागदपत्रासहित ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून आठ दिवसाचे आत खाली दिलेल्या पत्यावर योग्य त्या पुराव्यानिशी संपर्क साधावा व खात्री करून द्यावी. अन्यथा सदर मिळकत ही निर्वेध, निजोखमी अशी असून सदर मिळकतीशी इतर कोणाचाही हक्क हितसंबंध नाही व तो असल्यास जाणीवपूर्वक सोडून दिला आहे असे समजून आमचे अशिल पुढील व्यवहार पूर्ण करतील त्यानंतर कुणाचीही कसलीही तक्रार चालणार नाही.

ॲड. रोहिणी लक्ष्मण गाडेकर
(बी.ए.एल.एल.बी. डी. एल. एल.)
रा. सुर्या हाईटस, ओ-विंग, फ्लॅट नं. १०७,
कल्याण पेठ, जुन्नर, ता. जुन्नर, जि. पुणे. ४१०५०२.
मोबाईल नं. ९८६०४८३०३१.

# 'डेटिंग'च्या जाळ्यात ५०० महिला अडकल्या!


## लग्नाचे आमिष दाखवून २ कोटींचा गंडा घालणारा महाठग जेरबंद

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

"चित्रपट असो वा नाटक... वेगवेगळ्या ओळखी सांगून महिलांना प्रेमाच्या जाळ्यात ओढणाऱ्या आणि त्यांची लाखो रुपयांची फसवणूक करणाऱ्या ठगांच्या गोष्टी तुम्ही आजवर पडद्यावर पाहिल्या असतील. अशीच फिल्मी स्टाईल फसवणुकीची घटना समोर आली आहे. एका ठगाने तब्बल ५०० हून अधिक महिलांची सुमारे २ कोटी रुपयांची फसवणूक केली असून, दिल्ली सायबर पोलिसांनी त्याला अटक केली आहे. त्याच्याकडून चार मोबाईल फोन, आठ सिमकार्ड, तीन डेबिट कार्ड आणि फसवणुकीच्या पैशातून खरेदी केलेले सोन्याचे दागिने जप्त केले आहेत.

'मॅच, डेट, नाटक आणि फसवणूक' या चार शब्दांभोवती पश्चिम बंगालमधील उत्तर २४ परगणा येथील रहिवासी आनंद कुमार याचे आयुष्य फिरत होते. कुमार डेटिंग आणि मॅट्रिमोनिअल (वैवाहिक) ॲप्सवर कधी डॉक्टर, कधी व्यावसायिक, चित्रपट निर्माता तर कधी वकील असल्याची खोटी ओळख सांगून महिलांशी संपर्क साधायचा. काही काळानंतर तो त्यांच्याशी भावनिक नाते निर्माण करायचा आणि लग्नाचे आमिष दाखवायचा. काही प्रकरणांमध्ये त्याने मॉडेलिंगच्या संधी आणि नामांकित महाविद्यालयांमध्ये प्रवेश मिळवून देण्याचे आश्वासनही दिले होते.

डेटिंगच्या काळात कुमार ओळख झालेल्या महिलेबरोबर भावनिक नाते निर्माण झाल्याचे नाटक करायचा. यानंतर ओळख वाढवून लग्नाचे आमिषही दाखवायचा. याच काळात आपण खूपच दुःखी असल्याचे सांगायचा. मोठा आजार किंवा व्यवसायात झालेले नुकसान किंवा कौटुंबिक समस्या असल्याचे सांगायचा. महिलेची सहानुभूती मिळवून आर्थिक मदत मागायचा. एकदा



का पैसे मिळाले की, तो गायब होत असे.

एका पीडित महिलेने तक्रार दाखल केली. वैभव अरोरा नावाच्या इंस्टाग्राम प्रोफाईलवरून एका व्यक्तीने आपली ७ लाख रुपयांची फसवणूक केल्याचा आरोप तिने केला. या दोघांची ओळख एका डेटिंग ॲपवर झाली होती, त्यानंतर ते इंस्टाग्राम आणि व्हॉट्सॲपवर बोलू लागले. अरोराने तिला लग्नाचे वचन दिले आणि नंतर विविध कारणांनी तिच्याकडून पैसे उकळले. जेव्हा पीडितेने पैसे परत मागितले, तेव्हा त्याने प्रतिसाद देणे बंद केले. "वैभव अरोरा" याचा मृत्यू झाला असल्याचा दावाही त्या इंस्टाग्राम अकाउंटवरून करण्यात आला.

या प्रकरणाचा तपास करण्यासाठी एक विशेष पथक स्थापन करण्यात आले. पोलिसांनी आरोपीचा मोबाईल क्रमांक, सोशल मीडिया खाती आणि आर्थिक व्यवहारांची बारकाईने चौकशी केली. तपासात असे निष्पन्न झाले की, वैभव अरोरा बनून फसवणूक करणारा हा व्यक्ती प्रत्यक्षात पश्चिम बंगालचा रहिवासी आनंद कुमार आहे. सायबर पोलिसांनी बंगालमध्ये अनेक ठिकाणी छापे टाकून आरोपीला अटक केली.

चौकशीत असे समोर आले की, कुमार एकाच वेळी अनेक नावांनी वावरत होता. त्याने डॉ. रोहित बहल, तरुण आणि आनंद शर्मा अशा वेगवेगळ्या नावांनी प्रोफाईल्स चालवले होते; अगदी 'शिखा' या नावानेही तो सक्रिय होता. पोलिसांपासून वाचण्यासाठी तो अनेक मोबाईल फोन आणि विविध सिमकार्ड वापरत असे.

पोलिसांनी आरोपीकडून चार मोबाईल फोन, आठ सिमकार्ड, तीन डेबिट कार्ड आणि फसवणुकीच्या पैशातून खरेदी केलेले सोन्याचे दागिने जप्त केले आहेत. तपासात असेही आढळले की, फसवणुकीतून मिळालेल्या पैशांचा मोठा हिस्सा त्याने ऑनलाइन गेमिंग आणि चैनीच्या जीवनशैलीवर खर्च केला होता. आरोपीविरुद्ध यापूर्वी दिल्ली आणि गाझियाबादमध्येही गुन्हे दाखल आहेत. या रॅकेटमध्ये आणखी कोणाचा सहभाग आहे का, याचा तपास पोलीस करत आहेत.

## अकासा एअर आणि स्पाईसजेटची विमाने एकमेकांना भिडली

### दोन्ही विमानांचे मोठे नुकसान; डीजीसीएने चौकशी सुरू केली

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

दिल्ली विमानतळाच्या 'टॅक्सीवे'वर (विमानांच्या हालचालीसाठीचा मार्ग) गुरुवारी दुपारी अकासा एअर आणि स्पाईसजेट कंपनीच्या दोन विमानांचे पंख एकमेकांना घासले गेले. या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसून सर्व प्रवासी सुरक्षित असल्याची पुष्टी अधिकाऱ्यांनी केली. यामध्ये दोन्ही विमानांचे नुकसान झाल्यामुळे, ती सध्या उड्डाणासाठी थांबवून ठेवण्यात आली आहेत.

अधिकाऱ्यांनी सांगितले की, दुपारी साधारण २.१५ वाजता विमानतळाच्या 'टर्मिनल १' जवळ



ही घटना घडली. त्यावेळी अकासा एअरचे विमान उड्डाणासाठी टॅक्सीवेवरून पुढे सरकत होते, तर स्पाईसजेटचे विमान पार्किंग स्टँडच्या दिशेने जात होते. अकासा एअरचे विमान दिल्लीहून हैदराबादसाठी उड्डाण होणार होते, तर स्पाईसजेटचे विमान लेह येथून दिल्लीला दाखल झाले होते.

नागरी हवाई वाहतूक महासंचालनालयाने (डीजीसीए) या घटनेबाबत अधिकृत निवेदन जारी केले. या घटनेनंतर सुरक्षा मानकांचा आढावा घेतला जात असल्याचे त्यात सांगितले. ही घटना कशी घडली आणि प्रक्रियेत कोणत्या त्रुटी राहिल्या, हे निश्चित करण्यासाठी डीजीसीएने या घटनेची सखोल चौकशी सुरू केली असल्याचे सांगितले.

## चेक क्लिअरन्ससाठी सादर करण्यास विलंब झाल्यास बँक जबाबदार

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

"बँकेने कोणत्याही योग्य कारणाशिवाय ग्राहकाचा चेक वेळेत क्लिअरन्ससाठी सादर केला नाही, तर ती 'सेवेतील त्रुटी' मानली जाईल," असा महत्वपूर्ण निकाल सर्वोच्च न्यायालयाने १५ एप्रिल (बुधवार) रोजी दिला. या प्रकरणी न्यायमूर्ती बी.व्ही. नागरत्ना आणि न्यायमूर्ती उज्ज्वल भुयान यांच्या खंडपीठाने ग्राहक संरक्षण कायद्यांतर्गत कॅनरा बँकेला ठोठावलेला दंड कायम ठेवला आहे.

'लाईव्ह लॉ'च्या रिपोर्टनुसार, संबंधित ग्राहकाने २९ मे २०१८ रोजी एकूण १,०६,१०,७६८ रुपयांचे दोन धनादेश (चेक) कॅनरा बँकेत जमा केले होते. ह्या दोन्ही चेकची वैधता २ जून २०१८ रोजी संपणार होती. सुरुवातीला बँकेने तांत्रिक कारणास्तव हे चेक परत आल्याचे सांगितले. बँकेने ते तात्काळ पुन्हा सादर करणे आवश्यक होते, परंतु बँकेने विलंब केला. परिणामी, मुदत संपल्यानंतर ते चेक सादर केले गेल्याने जुना चेक म्हणून नाकारले गेले. बँकेने ३० आणि ३१ मे रोजी पुकारलेल्या बँक संपाचे कारण देत विलंब समर्थनीय असल्याचा दावा केला होता. मात्र, न्यायालयाने हा दावा फेटाळून लावला. संपांनंतर १ आणि २ जून हे कामकाजाचे दिवस उपलब्ध असतानाही बँकेने चेक सादर का केले नाहीत? असा सवाल न्यायालयाने उपस्थित केला.

## नाकारली १७ लाखांची नोकरी? इन्स्टा पोस्टमध्ये मांडली वर्क कल्चरची व्यथा

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

आयआयटी दिल्लीच्या एका २४ वर्षीय तरुणाने कॉर्पोरेट बँकिंगमधील आपली भरघोस पगाराची नोकरी का सोडली, याची व्यथा मांडली आहे. कामाचे अवास्तव तास आणि सेल्सचे (विक्रीचे) आक्रमक लक्ष्य गाठण्यासाठी दिला जाणारा प्रचंड दबाव, यामुळे त्रस्त होऊन त्याने हा निर्णय घेतला. "लंच ब्रेकसाठी केवळ १५ मिनिटे मिळायची," असे सांगत त्याने कॉर्पोरेट क्षेत्रातील या भयावह वास्तव जगासमोर मांडले आहे. त्याच्या या अनुभवामुळे सध्या सोशल मीडियावर टॉक्सिक कार्यसंस्कृतीबाबत चर्चा रंगली आहे.

बँकिंग क्षेत्रात वार्षिक १७ लाख रुपयांचे पॅकेज घेणाऱ्या चिराग मदानने कामाच्या अतिव्याप्त दबावामुळे अखेर नोकरी सोडण्याचा धाडसी निर्णय घेतला आहे. चिरागने आपला अनुभव इन्स्टा पोस्टमध्ये शेअर करताना सांगितले की, सुरुवातीला सकाळी ९ ते संध्याकाळी ५ अशी असलेली त्याच्या कामाची वेळ हळूहळू संध्याकाळी ७ वाजेपर्यंत ताणली गेली. केवळ कामाचे तास वाढले नाहीत, तर आठवड्यातून पाच दिवस असणारे काम सहा दिवसांवर गेले. कामाचे वाढलेले स्वरूप आणि वैयक्तिक आयुष्यावर होणारा त्याचा परिणाम सुरू झाला. कार्यालयात दुपारी जेवणाच्या सुट्टीवरही कमालीचे निर्बंध होते. कामाचा व्याप इतका प्रचंड होता की, कर्मचाऱ्यांनी अवघ्या १० ते १५ मिनिटांत आपले जेवण उरकावे, अशी व्यवस्थापनाची अपेक्षा असे. केवळ कामाचे तास किंवा जेवणच नाही, तर आजारपणामुळे रजा मिळणे अवघड होते.

## अंदमान समुद्रात प्रवाशांची बोट उलटली

### 250 हून अधिक लोक बेपत्ता; 9 जणांना वाचवण्यात यश

**अंदमान (दै. संध्या) :**

मलेशियाच्या दिशेने जाणारी प्रवाशांची एक बोट अंदमान समुद्रात उलटली आहे. या दुर्घटनेत 250 हून अधिक लोक अद्याप बेपत्ता आहेत. या बोटीतून शेकडो लोक बेकायदेशीररीत्या प्रवास करत होते. यामध्ये बहुतांश स्थलांतरित मजूर आणि बांगला देशी नागरिकांचा समावेश होता. यातील बहुतांशी रोहिंग्या आणि बांगला देशी नागरिक आहेत.

या घटनेत आतापर्यंत किमान 9 जणांना वाचवण्यात यश आले आहे. बांगला देश कोस्ट गार्डकडून बेपत्ता लोकांचा शोध घेण्यासाठी बचाव कार्य सुरू आहे. बांगला देशी वृत्तपत्र 'द डेली स्टार'च्या अहवालानुसार, या बोटीवर स्थलांतरित (बहुतांश रोहिंगे)



आणि बांगला देशी नागरिकांसह सुमारे 250 ते 280 लोक होते.

असे सांगितले जात आहे की, ही बोट अनेक दिवस समुद्रात राहिल्यानंतर उलटली. या भागातील गस्तीवर असलेल्या जहाजाने समुद्रातून 9 जणांना वाचवल्यानंतर ही घटना उघडकीस आली. बांगला देश कोस्ट गार्डचे मीडिया अधिकारी लेफ्टनंट सब्बीर आलम सुजन यांनी एका प्रसिद्धीपत्रकात माहिती दिली की, 'एमटी मेघना प्राईड' नावाचे बांगला देशी ध्वज असलेले जहाज चटगावहून इंडोनेशियाकडे जात असताना हा प्रकार लक्षात आला.

# बागेश्वर धामला आता परदेशातूनही 'देणगी'

## गृह मंत्रालयाची कृपा! फॉरेन कंट्रीब्यूशन रेगुलेशन एक्ट (FCRA) अंतर्गत परवानगी

**नवी दिल्ली (दै. संध्या) :**

धीरेंद्र शास्त्री यांची संस्था बागेश्वर धाम यांना आता परदेशातून देणगी मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. मध्य प्रदेशच्या छत्तरपूर जिल्ह्यातील बागेश्वर धामला केंद्रीय गृह मंत्रालयानं फॉरेन कंट्रीब्यूशन रेगुलेशन एक्ट (FCRA) अंतर्गत परवानगी मिळाली आहे. आता धीरेंद्र शास्त्रींच्या या संस्थेला परदेशातून कायदेशीररित्या देणगी मिळणार आहे. आतापर्यंत परदेशातून देणगी



मिळवण्यासाठी संस्थेला विशेष परवानगीची गरज होती.

धीरेंद्र कृष्ण शास्त्री यांच्या देखरेखीखाली बागेश्वर जन सेवा समिती ग्राम गडा छतरपूर येथून काम करते. ही संस्था धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक, सांस्कृतिक आणि आर्थिक क्षेत्रात सक्रीय आहे.

गेल्या काही काळापासून बागेश्वर बाबा या नावानं प्रसिद्ध झालेल्या धिरेंद्र शास्त्री सतत चर्चेत असतात. त्यांच्या प्रवचन कार्यक्रमात मोठ्या संख्येनं लोकं येत असतात. त्यांचे फॉलोअर्स देशातच नाही तर परदेशात देखील आहेत. अशा परिस्थितीत संस्थेसाठी आता परदेशातून देणगी मिळण्याचा मार्ग मोकळा होणे खूप महत्वाचे ठरले आहे.

एफसीआरएबाबतच्या नियमांबद्दल बोलायचं झालं तर FCRA जी कोणती संस्था परदेशातून देणगी घेते त्या संस्थेला त्यांचा पूर्ण हिशेब ठेवणं बंधनकारक आहे. सरकारला हा पैसा कुठून आला आणि कुठं खर्च झाला याची माहिती देणे बंधनकारक आहे. या पैशाची देवाण घेवाण ही बँक खात्यामार्फत होते. याचा नियमीत अहवाल द्यावा लागतो.

१५ एप्रिल २०२६ पर्यंत FCRA अंतर्गत १४ हजार ५३८ एनजीओ पाच वर्षाच्या नोंदनीद्वारे सक्रिय आहे. २०१५ पासून आतापर्यंत १८००० पेक्षा जास्त लायसन्स रद्द करण्यात आले आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मल्याळी बांधवांनी साजरा केला "विशू" श्रीकृष्ण मंदिरात वार्षिक महोत्सव

पिंपरी (दैनिक संध्या) : निगडी भक्ती- शक्ती समोर असलेल्या श्रीकृष्ण चॅरिटेबल फौंडेशनच्या वतीने श्रीकृष्ण मंदिरामध्ये दि ८ ते २१ या दरम्यान आयोजित करण्यात आलेल्या वार्षिक महोत्सवात मल्याळी नवीन वर्षारंभ म्हणजेच "विशू" हा सण दि १५ रोजी साजरा करण्यात आला. यानिमित्ताने मल्याळी बांधवांनी श्रीकृष्ण मंदिरामध्ये देवदर्शनासाठी मोठी गर्दी केली होती. मल्याळी बांधवानी एकमेकांना शुभेच्छा देतो आनंद व्यक्त केला. सर्व मळ्याली बांधवांनी आपल्या घरोघरी "विशूकनी" म्हणजेच फुल फळांची आरास करून भगवान श्रीकृष्ण मूर्तीची पूजा केली. घरी गोड धोड भोजनाचा आनंद घेतला. वर्षातून येणाऱ्या सणामुळे सर्व बांधवांच्या चेहऱ्यावर आनंद ओसंडून वाहत होता. मंदिरात सकाळी जागरण, निर्मल्य दर्शन, अभिषेक,महागणपती होम, उषा पूजा,मुळा पूजा, पंदीर्थी पुज,उच्च पूजा श्री भूताबेली आशा धार्मिक निधी संपन्न झाल्या. दुपारी मंदिरात आयोजित केलेल्या अन्नदानाचा सुमारे १००० भाविकांनी लाभ घेतला. संध्याकाळी दीप आराधना भगवती सेवा, जप पूजा, भागवत नारायण आशा विधी संपन्न झाल्या.निलांबरी डान्स ग्रुप प्रस्तुत गुरु सुजा दिनकर आणि सहकारी कलाकारांनी नृत्यसंध्या हा पारंपारिक नृत्याचा कार्यक्रम सादर केला. कार्यक्रमासाठी श्रीकृष्ण चॅरिटेबल फाउंडेशनचे अध्यक्ष सी पी शशीधरण, सचिव पी एम व्ही कैलम, खजिनदार निशा अनिल यांनी विशेष परिश्रम घेतले.




### मावळ बाजार समिती बरखास्त; सभापती निवडणुकीनंतर राजकीय नाट्य

पिंपरी (दैनिक संध्या) : मावळ तालुका कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये सभापती पदाच्या निवडणुकीवरून घडलेल्या राष्ट्रवादी काँग्रेस संचालकांच्या राजीनामा नाट्यानंतर जिल्हा उपनिबंधकांनी बाजार समिती संचालक मंडळ बरखास्त झाल्याचा आदेश दिल्याने निवड झाल्यानंतर अवघ्या 21 दिवसांत सभापतींसह भाजपच्या संचालकांची घरी बसण्याची वेळ आली आहे. दरम्यान, भाजपने राष्ट्रवादीला केलेल्या धोबीपछाडनंतर आमदार सुनील शेळके यांनी मात्र भाजपवर चांगलाच पलटवार केल्याचे दिसत आहे. तीन वर्षांपूर्वी लाखो रुपये खर्च झालेल्या निवडणुकीत 18 संचालक निवडून आले होते. यामध्ये राष्ट्रवादीचे 16, काँग्रेस 1 व भाजप 1 असे संख्याबळ होते. विधानसभा निवडणुकीनंतर आणखी चार संचालकांनी भाजपमध्ये प्रवेश केला, त्यामुळे भाजपचे एकूण 5 संचालक झाले. तरीही 13 संचालक असल्याने राष्ट्रवादीचे एकहाती वर्चस्व होते. दरम्यान, नुकत्याच झालेल्या सभापती पदाच्या निवडणुकीत राष्ट्रवादीचेच 6 संचालक फुटले आणि भाजपचे सुभाषराव जाधव हे सभापती झाले. हा पराभव राष्ट्रवादीच्या चांगलाच जिव्हारी लागला होता. त्यामुळे आमदार सुनील शेळके, जिल्हाध्यक्ष विठ्ठलराव शिंदे, तालुकाध्यक्ष गणेश खांडगे यांनी तातडीची बैठक घेतली. यामध्ये राष्ट्रवादीच्या संचालकांनी त्वरित राजीनामे द्यावेत, अन्यथा पक्षातून हकालपट्टी करण्याचा इशारा दिला होता. आमदार शेळके यांचा आदेश मानून राष्ट्रवादीचे 12 व काँग्रेसचे 1 अशा 13 जणांनी आपले राजीनामे सहायक निबंधक नवनाथ अनपट यांच्याकडे सुपूर्द केले आणि बाजार समितीवर टांगती तलवार आली. यानंतर झालेली पहिली बैठकही कोरमअभावी रद्द झाली. आधीच्या सभापती, उपसभापतींनी राजीनामे द्यावे म्हणून एकवटलेले संचालक सभापती पदाच्या निवडणुकीत मात्र फुटले, त्यामुळे आगीतून उठले आणि फुफाट्यात पडले अशी गत झाली होती. दरम्यान, जिल्हा उपनिबंधक यांनी महाराष्ट्र कृषी उत्पन्न खरेदी-विक्री (विकास व विनियमन) अधिनियम 1963 अंतर्गत कलम 45 (1) नुसार कृषी उत्पन्न बाजार समिती बरखास्त करून सहायक निबंधक अनपट यांची प्रशासक म्हणून नियुक्ती करण्यात आल्याचा आदेश दिला आहे.



### बनावट दस्तऐवज तयार करून पतसंस्थेत साडेसहा कोटींचा अपहार

पिंपरी (दैनिक संध्या) : बनावट दस्तऐवज तयार करून ६ कोटी ५३ लाख ९२ हजार ४२ रुपयांचा अपहार केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला आहे. खेड तालुक्यातील वाकी बुद्रूक येथे भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत २०१३-१४ ते २०१७-१८ या आर्थिक वर्षांमध्ये ही घटना घडली. सुनील मथुरा काळे (वय ५५, रा. मोहननगर, धनकवडी, पुणे) यांनी याप्रकरणी बुधवारी (दि. १५ एप्रिल) उत्तर चाकण पोलिस ठाण्यात फिर्याद दिली आहे. रामदास हिरामण कड, तुकाराम पिराजी टोपे, किसन सोपान गारगोटे, बाळासाहेब पंडित गारगोटे, रवींद्र नामदेव गारगोटे, अनिल गोविंद टोपे, शिवाजी बाबूराव जरे, काळुराम पांडुरंग टोपे, राजाराम किसन टोपे, सुरेश रंगनाथ लोखंडे, दत्तात्रय वाल्मीक गोरे, शांताराम बापू जगताप, विमल बबन गारगोटे, रामदास ज्ञानेश्वर जाधव, गोरख भागुजी टोपे, सुरेखा लक्ष्मणराव टोपे, मारुती ज्ञानोबा गारगोटे, राहुल रामदास टोपे, दत्तात्रय संतू टोपे, अंकुश रामदास जरे, नीलेश हनुमंत टोपे, सुरेश शिवाजी टोपे, संतोष दत्तात्रय टिपरे, सुरेखा लहू गारगोटे, सुरेखा संजय टोपे, काळुराम लक्ष्मण गारगोटे, शिवाजी दगडू टोपे, सुरज लक्ष्मण टोपे, सुरेखा लक्ष्मण टोपे, शिवाजी किसन भोंडवे, सारिका रोहिदास गारगोटे, रोहिदास तुकाराम गारगोटे, सुरेखा सुरेश लोखंडे, अनिता काळुराम गारगोटे, विशाल दत्तात्रय पवळे, रामदास संतू टोपे (सर्व रा. वाकी बुद्रूक, ता. खेड, जि. पुणे) यांच्या विरोधात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

# पिंपरी-चिंचवडमध्ये पुन्हा सायकल शेअरिंग

## पिंपळे सौदागरमध्ये प्रायोगिक सुरुवात; कोट्यवधींच्या प्रकल्पांना हिरवा कंदील; स्थायी समितीकडून विकासकामांना मंजुरी

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड शहरात बंद करण्यात आलेला पब्लिक बायसिकल शेअरींग उपक्रम पुन्हा सुरू करण्यात येत आहे. त्यासाठी पिंपळे सौदागर येथे दोन ठिकाणी प्रायोगिक तत्त्वावर सुरुवात करण्यात आली आहे. यासह विविध विकासकामांच्या खर्चांना स्थायी समितीने बुधवार (दि. 15) झालेल्या सभेत मंजुरी दिली. सभेच्या अध्यक्षस्थानी समितीचे अध्यक्ष अभिषेक बारणे होते. यावेळी समितीचे सदस्य, आयुक्त डॉ. विजय सूर्यवंशी, नगरसचिव मुकेश कोळप व अधिकारी उपस्थित होते. पिंपरी-चिंचवड स्मार्ट सिटी लिमिटेडच्या वतीने मोठा गाजावाजा करीत शहरात पब्लिक बायसिकल शेअरींग उपक्रम सुरू करण्यात आला होता.

मात्र, नागरिकांच्या प्रतिसादाअभावी तसेच, सायकलची चोरी व मोडतोड झाल्याने तो उपक्रम गुंडाळण्याची नामुष्की प्रशासनावर ओढवली होती. तोच उपक्रम आता भोसरी येथील प्रीवाई टेक्नॉलॉजीस प्रा. लि. कंपनीच्या सहकार्याने महापालिका शहरभरात राबत आहे. त्यातील 10 टक्के उत्पन्न महापालिकेस मिळणार आहे. सायकल भाडे तसेच, स्टॅण्डवर जाहिरात प्रदर्शन करून ती कंपनी उत्पन्न मिळवणार आहे. पहिल्या टप्प्यात पिंपळे सौदागर येथे दोन ठिकाणी हा उपक्रम सुरू करण्यात आला आहे. सकाळी व संध्याकाळी प्रत्येकी 2 तास सायकल भाड्याने दिल्या जाणार आहेत.



सामान्य सायकलसाठी प्रति मिनिट 25 पैसे तर, मासिक पास 350 रुपये आहे. इलेक्ट्रिक सायकलसाठी प्रति मिनिट 50 पैसे तर, मासिक भाडे 550 रुपये आहे. सायकलसाठी एका दिवसाचा पास 60 रुपये आणि इलेक्ट्रिक सायकलचे भाडे 100 रुपये आहे. हा उपक्रम यशस्वी झाल्यास तो संपूर्ण शहरात राबवला जाणार आहे, असे अध्यक्ष अभिषेक बारणे यांनी सांगितले.

## द्वारका यात्रेच्या नावाखाली ऑनलाईन फसवणूक

### बनावट हॉटेल बुकिंगचा सापळा; सायबर गुन्हेगारांचा नवा डाव, पोलिसांचे सतर्कतेचे आवाहन

**पिंपरी (दै. संध्या)**

'ऑनलाईन बुकिंगवर विश्वास ठेवून द्वारका यात्रेसाठी गेलो; मोबाईलवर दाखवलेले हॉटेल पाहून आम्ही निश्चिंत होतो. मात्र, प्रत्यक्ष ठिकाणी पोहोचलो तेव्हा समोर पडकी, ओसाड इमारत पाहून पायाखालची जमीनच सरकली. ना रूम, ना बुकिंग फक्त फसवणूक झाल्याचे लक्षात आले,' अशी हळहळ व्यक्त करत पिंपरी-चिंचवडमधील एका ज्येष्ठ नागरिकाने सायबर पोलिसांकडे आपला अनुभव मांडला. या घटनेमुळे त्यांना मोठा मानसिक त्रास सहन करावा लागला असून धार्मिक पर्यटनाच्या नावाखाली सुरू असलेल्या डिजिटल फसवणुकीचा आणखी एक प्रकार समोर आला आहे.




चिंचवड परिसरातील रहिवासी असलेल्या या ज्येष्ट नागरिकाने द्वारका येथे राहण्यासाठी मोबाईलच्या मदतीने गुगलवर हॉटेलचा शोध घेतला. आकर्षक फोटो, कमी दर आणि 'मर्यादित ऑफर'चा दावा पाहून त्यांनी तातडीने ऑनलाईन बुकिंग केले. संबंधित वेबसाइटवर स्वतःला 'अधिकृत एजंट' असल्याचा दावा करण्यात आला होता. काही वेळातच त्यांना फोन व व्हॉट्स ॲपवरून संपर्क साधून बुकिंग कन्फर्म असल्याचे सांगण्यात आले. 'रूम्स लवकर भरत आहेत,

लगेच पेमेंट करा' असा दबाव टाकत क्यूआर कोडद्वारे त्यांच्याकडून पैसे उकळण्यात आले.मात्र, द्वारका येथे पोहोचल्यावर प्रत्यक्षात दिलेल्या पत्त्यावर कोणतेही हॉटेल अस्तित्वात नसल्याचे उघड झाले. चौकशी केली असता ती इमारत बराच काळ बंद व पडकी असल्याचे स्थानिकांनी सांगितले. त्यानंतर संबंधित मोबाईल क्रमांकही बंद झाल्याने आपली फसवणूक झाल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, सायबर गुन्हेगारांकडून धार्मिक यात्रांच्या नावाखाली अशाच प्रकारे फसवणुकीचे प्रकार वाढत असल्याचे पोलिसांनी सांगितले. विशेषतः चारधाम, द्वारका, वाराणसी यांसारख्या तीर्थक्षेत्रांना जाणाऱ्या यात्रेकरूंना लक्ष्य केले जात आहे.

सायबर टोळ्या गुगल सर्च व सोशल मीडियावर बनावट वेबसाइट्स व जाहिराती दाखवतात. या वेबसाइट्स अधिकृत असल्याचा भास निर्माण केला जातो. त्यानंतर 'मर्यादित सीटस्', 'व्हीआयपी बुकिंग', 'तातडीची उपलब्धता' अशा आमिषांद्वारे ग्राहकांवर दबाव टाकला जातो. काही प्रकरणांमध्ये बनावट एजंट फोन किंवा व्हॉट्स ॲपवरून संपर्क साधून विश्वास संपादन करतात. त्यानंतर आधार, प्रवास तपशील यासारखी वैयक्तिक माहिती घेतली जाते आणि क्यूआर कोड किंवा यूपीआय आयडीवर पेमेंट करून घेतले जाते. पैसे मिळाल्यानंतर बनावट कन्फर्मेशन पाठवले जाते किंवा संपर्क तोडला जातो.

## पिंपरी-चिंचवडमध्ये पुलावर उधळपट्टीचा आरोप

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेने सांगवी व बोपोडी असा मुळा नदीवर पूल उभा केला आहे. त्यासाठी महापालिकेने 32 कोटी 36 लाख रुपये खर्च केले आहे. त्यानंतर पुलाच्या सुशोभिकरणावर आणखी तब्बल 20 कोटी 14 लाख रुपयांचा खर्च झाला आहे. आर्थिक स्थिती डबघाईत असताना महापालिका प्रशासन आणि सत्ताधाऱ्यांकडून झालेल्या या उधळपट्टीवरुन संताप व्यक्त केला जात आहे. निव्वळ टक्केवारीसाठी तसेच, बांधकाम व्यावसायिकांच्या भल्यासाठी अव्वाचा सव्वा खर्च करण्यात आल्याचे आरोप केले जात आहेत.

महापालिकेकडून सांगवी ते बोपोडीत स्मशानभूमी रस्ता असा मुळा नदीवर पूल उभारण्याचे नियोजन होते. मात्र, भाजपाच्या सन 2017 च्या सत्ताकाळात जागा बदलून सांगवी ते औंध चौकातील चंद्रमणी नगर असा पूल बांधण्यास मान्यता देण्यात आली. पुलाचे भूमिपूजन दिवंगत आमदार लक्ष्मण जगताप यांच्या हस्ते 5 जानेवारी 2022 ला झाले. त्यासाठी स्थापत्य प्रकल्प विभागाकडून तब्बल 32 कोटी 36 लाख रुपये खर्च करून 760 मीटर लांबीचा पूल तयार करण्यात आला. ते काम टी ॲण्ड टी इन्फ्रा लिमिटेड ठेकेदार कंपनीने केले असून, संथ गती कामामुळे त्याला मुदतवाढ देण्यात आली.

त्यासाठी अनेक झाडेही तोडण्यात आली. या पुलाचे लोकार्पण दिवगंत उपमुख्यमंत्री अजित पवार यांच्या हस्ते 14 ऑक्टोबर 2024 ला झाले. त्या वेळी त्यांनी शहरातील अनेक पूल व विकासकामाचे उद्‌घाटनही केले होते. त्यानंतर प्रशासकीय राजवटीत स्थापत्य प्रकल्प विभागाने पुलावर विद्युत सुशोभिकरणाचे स्वतंत्र दुसरी निविदा काढण्यात आली.

## आधी मारेकऱ्यांना पकडले अन् नंतर मृतदेहाची ओळख पटविली

**पिंपरी (दै. संध्या)**

कोणताही धागादोरा नसताना सापडलेल्या अनोळखी मृतदेहाच्या प्रकरणाची अवघ्या २४ तासांत उकल करत पिंपरी-चिंचवड गुन्हे शाखेच्या युनिट एकने तपास केला. सीसीटीव्ही फूटेजची छाननी करीत पोलिसांनी आधी तीन संशयितांना जेरबंद केले आणि त्यानंतर मयताची ओळख पटविण्यात यश मिळवले. खून प्रकरणातील गुन्हेगारांचा शोध घेऊन खून झालेल्या व्यक्तीची ओळख पटविण्यात आल्याचे हे दुर्मीळ प्रकरण ठरले.

चिखलीमधील पाटीलनगर येथे वन विभागाच्या जागेत २ फेब्रुवारी २०२५ रोजी एक अनोळखी मृतदेह आढळला. या प्रकरणी चिखली पोलिस ठाण्यात गुन्हा दाखल केला.

गुन्हे शाखा युनिट एकचे पोलिस निरीक्षक सुहास आव्हाड यांच्या मार्गदर्शनाखाली दोन पथकांनी तपास सुरू केला. ५० ते ६० सीसीटीव्ही कॅमेरे तपासताना अंमलदार सोमनाथ बोऱ्हाडे आणि स्वप्निल महाले यांना एक संशयित रिक्षा दिसून आली. त्यावरून मालकाकडे चौकशी केली. चिखलीतील एका चौकातून तीन जणांना रिक्षात बसविले होते, असे रिक्षामालकाने सांगितले. त्यानुसार २९ वर्षीय, २८ वर्षीय आणि २४ वर्षीय अशा तीन तरुणांना ताब्यात घेतले. त्यांनी खुनाची कबुली दिली.

## पिंपरीत उष्माघाताचा इशारा; महापालिका रुग्णालये सज्ज

### वाढत्या तापमानामुळे नागरिकांना सतर्कतेचे आवाहन

**पिंपरी (दै. संध्या)**

पिंपरी-चिंचवड महापालिकेच्या सर्व रुग्णालयांमध्ये अपघाताच्या रुग्णांसाठी आवश्यक वैद्यकीय सुविधा उपलब्ध करण्यात आल्या आहेत. आपत्कालीन परिस्थितीत त्वरित उपचार मिळण्यासाठी आरोग्य यंत्रणा सज्ज ठेवण्यात आली आहे. नागरिकांनी लक्षणांकडे दुर्लक्ष न करता वेळेवर उपचार घेणे अत्यंत आवश्यक आहे.

महापालिका प्रशासनाकडून सर्व नागरिकांना आवाहन करण्यात येत आहे की, वाढत्या तापमानाच्या पार्श्वभूमीवर योग्य ती खबरदारी घेऊन उष्माघातापासून स्वतःचे व आपल्या कुटुंबाचे संरक्षण करावे. शहरात दिवसेंदिवस तापमानात



वाढ होत असून उष्माघाताचा धोका निर्माण झाला आहे. या पार्श्वभूमीवर महापालिकेच्या वैद्यकीय विभागामार्फत नागरिकांना आवश्यक ती खबरदारी घेण्याचे आवाहन करण्यात येत आहे. उन्हाळ्याच्या दिवसांत योग्य काळजी घेतल्यास उष्माघातासारख्या गंभीर आजारापासून बचाव करता येऊ शकतो.

उष्माघात ही एक गंभीर आरोग्य समस्या असून शरीराचे तापमान अत्यंत वाढल्यास चक्कर येणे, अशक्तपणा, उलट्या, डोकेदुखी, गोंधळ होणे किंवा बेशुद्धावस्था अशी लक्षणे दिसू शकतात. अशा वेळी विलंब न करता त्वरित सावलीत जाऊन प्राथमिक उपचार घ्यावेत व जवळच्या महापालिका रुग्णालयाशी संपर्क साधावा, असे आवाहन करण्यात आले आहे.

**..अशी घ्यावी काळजी**

उष्माघात टाळण्यासाठी ही काळजी घ्यावी. दुपारी 12 ते 4 या वेळेत उन्हात जाणे टाळावे. भरपूर पाणी आणि द्रवपदार्थ सेवन करावे. डोक्यावर टोपी, छत्री किंवा कापड वापरावे. सैल व हलक्या रंगाचे सूती कपडे परिधान करावेत. उपाशीपोटी बाहेर पडू नये. थकवा जाणवल्यास त्वरित सावलीत विश्रांती घ्यावी. लहान मुले, ज्येष्ठ नागरिक आणि बाहेर काम करणाऱ्यांनी विशेष काळजी घ्यावी.

# मुंबई-पुणे द्रुतगती मार्गावरील मिसिंग लिंक अंतिम टप्प्यात

## 30 मिनिटांचा वेळ वाचणार; अत्याधुनिक बोगदे व पूलामुळे प्रवास अधिक सुरक्षित आणि वेगवान

**पिंपरी (दै. संध्या)**

मुंबई-पुणे द्रुतगती महामार्गावरील प्रवासाचा चेहरामोहरा बदलणारा आणि अभियांत्रिकी क्षेत्रातील चमत्कार मानला जाणारा मिसिंग लिंक प्रकल्प आता अंतिम टप्प्यात आला आहे. येत्या 1 मेपासून (महाराष्ट्र दिन) हा मार्ग वाहतुकीसाठी खुला करण्याचा महाराष्ट्र शासनाचा मानस असून, त्यादृष्टीने युद्धपातळीवर प्रयत्न सुरू आहेत. या प्रकल्पामुळे मुंबई-पुणे प्रवासातील वेळ तब्बल 30 मिनिटांनी कमी होणार आहे.

मुंबई-पुणे द्रुतगती मार्ग बांधताना लोणावळा घाट परिसरातील कठीण भूप्रदेश, तीव उतार, तीक्ष्ण वळणे आणि दाट धुके यामुळे एक महत्त्वाचा भाग थेट जोडता आला नव्हता. ही मिसिंग राहिलेली कनेक्टिव्हिटी आता पूर्ण झाली असून, यामुळे खंडाळा घाटातील अवघड वळणे आणि वाहतूक कोंडीचा त्रास कायमचा दूर होणार आहे.

**प्रकल्पाची वैशिष्ट्ये आणि जागतिक विक्रम**

देशातील सर्वात लांब बोगदा या प्रकल्पात एकूण दोन बोगदे असून, त्यातील 9 किमी लांबीचा बोगदा हा देशातील सर्वांत लांब बोगदा ठरणार आहे. सर्वांत रुंद बोगदा : 23.5 मीटर रुंदीचा हा बोगदा जगातील सर्वांत रुंद बोगद्यांपैकी एक आहे. हा संपूर्ण मार्ग आठ पदरी असणार आहे. उंच पूल : प्रकल्पांतर्गत 185 मीटर उंचीचा एक भव्य पूल बांधण्यात आला आहे. तर, 150 मीटर उंचीचा केबल-स्टेड पूल अभियांत्रिकी कौशल्याचा अप्रतिम



नमुना ठरला आहे. वेळ आणि इंधनाची बचत : या प्रकल्पामुळे प्रवासाचे अंतर 6 किलोमीटरने कमी होईल, ज्यामुळे दररोज प्रवाशांचा 30 मिनिटांचा वेळ वाचेल आणि सुमारे 1 कोटी रुपयांच्या इंधनाची बचत होईल.

**सुरक्षेसाठी अत्याधुनिक स्मार्ट यंत्रणा**

प्रवाशांच्या सुरक्षेसाठी या बोगद्यात जागतिक दर्जाची तंत्रज्ञान प्रणाली बसवण्यात आली आहे: स्वयंचलित अग्निशमन यंत्रणा बसविण्यात आली आहे. बोगद्यात आग लागल्यास भिंतीमधील सेन्सर्स तात्काळ सक्रिय होतील आणि वॉटर मिस्टच्या माध्यमातून उच्च दाबाने पाणी फवारून आग विझवली जाईल.

**हवेच्या गुणवत्तेवर लक्ष देण्यात येणार**

हवेच्या गुणवत्तेवर लक्ष देण्यात आले आहे. बोगद्यातील कार्बन मोनॉक्साईड आणि नायट्रोजन ऑक्साईड यांसारख्या विषारी वायूंचे रिअल-टाइम निरीक्षण केले जाणार आहे. लिनियर हिट डिटेक्शन यंत्रणेद्वारे बोगद्यातील तापमानावर नियंत्रण ठेवले जाईल आणि वातावरण थंड ठेवण्यासाठी ठराविक अंतरावर पाण्याची फवारणी केली जाईल.

**डिजिटल सूचना फलक**

वाहनचालकांना मार्गदर्शन आणि सूचना देण्यासाठी संपूर्ण मार्गावर जागोजागी डिजिटल फलक लावण्यात आले आहेत. सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत उभारलेला हा प्रकल्प केवळ एक शॉर्टकट नसून, आधुनिक महाराष्ट्राच्या प्रगतीचे आणि सुरक्षित प्रवासाचे प्रतीक ठरणार आहे. सध्या मिसिंग लिंकचे काम पूर्ण झाले असून, तो मुख्य मार्गाला जोडणाऱ्या भागातील दुरुस्तीची कामेही अंतिम टप्प्यात आहेत.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### जीवन खरोखरच सुंदर आहे, या सुंदर जीवनाचा मनापासून आनंद घेण्याची गरज : शिंदे

चाकण (दैनिक संध्या) : जीवन खरोखरच सुंदर आहे, या सुंदर जीवनाचा प्रत्येकाने मनापासून आनंद घेण्याची गरज आहे, असे विचार सुप्रसिद्ध व्याख्याते गणेश शिंदे यांनी व्यक्त केले. चाकण रोटरी क्लबच्या वतीने चाकण येथे आयोजित करण्यात आलेल्या कै. शेठ धनराजजी सांकला स्मृती व्याख्यानमालेत दीपप्रज्वलन करून शुभारंभ करताना गणेश शिंदे बोलत होते. यावेळी चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षा सुवर्णा गोरे, सचिव डॉ. प्रज्ञा भवारी, व्याख्यानमाला समितीचे अध्यक्ष भाऊसाहेब घोमल, रोटरी ३१३१ चे जिल्हा प्रांतपाल मोहन पालेशा, उद्योजक अजित दानोले, चाकण शिक्षण मंडळाचे विश्वस्त मोतीलाल सांकला, सचिव डॉ. अविनाश अरगडे, डॉ. पल्लवी बेनके, डॉ. प्रज्ञा भवारी, डॉ. अमोल बेनके आदी यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. प्रसिद्ध प्रवचनकार व गप्पाष्टकार डॉ. संजय उपाध्ये यांनी " मन करा रे प्रसन्न " या विषयवार दुसरे, तर प्रसिद्ध प्रवचनकार प्रा. दिगंबर ढोकले यांनी " वन इन बिलियन " या विषयावर तिसरे पुष्प गुंफले. निवृत्त कमांडो श्रीकांत देशमुख यांनी " युद्धजन्य परिस्थिती आणि भारत " या विषयवार चौथे पुष्प गुंफले. व्याख्यानमाला कमिटीचे चेअरमन भाऊसाहेब घोमल, चाकण रोटरी क्लबच्या अध्यक्षा सुवर्णा गोरे व सचिव डॉ. प्रज्ञा भवारी यांनी स्वागत केले.

### भामा खोऱ्यातील विकास कामांसाठी 8 कोटी 60 लाखांचा निधी मंजूर

चाकण (दैनिक संध्या) : खेड तालुक्यातील भामा खोऱ्यातील विकास कामांसाठी ८ कोटी ६० लाख रुपयांचा निधी मंजूर झाला असल्याची माहिती पुणे जिल्हा परिषदेच्या सदस्या सुनिता बुट्टे पाटील यांनी दिली. विकास कामांना निधी उपलब्ध करून घेण्यासाठी नेतृत्वाचे पाठबळ लागते, गाववाडी वस्तीवर संपर्क लागतो, विकास योजना माहिती असावे लागते, जनसेवा करण्याची प्रामाणिक इच्छा असावी लागते. भामा खोऱ्याच्या विकासासाठी आम्ही कायम कटिबद्ध राहत असल्याचे बुट्टे पाटील यांनी सांगितले. राज्याच्या उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार, खेडचे माजी आमदार दिलीप मोहिते व आम्ही सर्वांनी एकत्र प्रयत्न करून जिल्हा वार्षिक योजना आराखडा तसेच सुनेत्रा पवार यांचा खासदार निधी या माध्यमातून मोठ्या प्रमाणावर निधी खेचून आणला आहे. यामध्ये वर्षानुवर्ष रखडलेल्या अनेक कामांना निधी देण्याचे काम आम्ही केले आहे. विशेष करून ज्या गावांनी कोणत्याही प्रलोभनाला बळी न पडता विकास कामांना साथ दिली. अशा अनेक छोट्या छोट्या गावांना प्रचंड मोठा निधी देण्याचे काम आम्ही केले आहे. यापुढील काळात देखील जिल्हा परिषदेमध्ये राष्ट्रवादी काँग्रेसची सत्ता असल्याने मोठ्या प्रमाणावर सर्वच विभागातून गाव आणि वाडी वस्तीवर आम्ही विकास कामे करणार असल्याचे सुनीता शरद बुट्टेपाटील यांनी आवर्जून सांगितले.

### देहविक्री व्यवसायाचा पर्दाफाश; युगांडाच्या 2 महिलांची सुटका

लोहगाव (दैनिक संध्या) : पोरवाल रोडवरील एका उच्चभ्रू सोसायटीत सुरू असलेल्या देहविक्री व्यवसायावर लोहगाव पोलिसांनी छापा टाकून मोठ्या कारवाईची नोंद केली आहे. या कारवाईत दोन विदेशी महिलांची सुटका करण्यात आली असून, वेश्याव्यवसाय चालवणारी युगांडाची महिला आणि तिला फ्लॅट उपलब्ध करून देणाऱ्या घरमालकावर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. लोहगाव पोलीस स्टेशनच्या पथकाला पोरवाल रोडवरील 'दुर्वा हेरीटेज' सोसायटीतील फ्लॅट नंबर ४०३ मध्ये अनैतिक व्यवसाय सुरू असल्याची खात्रीशीर माहिती मिळाली होती. या माहितीच्या आधारे बुधवारी (दि. १५ एप्रिल) रात्री ७:५० च्या सुमारास पोलिसांनी सदर ठिकाणी छापा टाकला. यावेळी युगांडा देशाच्या दोन पीडित महिलांना पैशांचे आमिष दाखवून त्यांच्याकडून वेश्याव्यवसाय करून घेतला जात असल्याचे समोर आले.

### चुकीची माहिती प्रसारित केल्याप्रकरणी विस्तार अधिकाऱ्याचे निलंबन

पुरंदर (दैनिक संध्या) : पुरंदर तालुक्यातील खानवडी येथील ज्योती सावित्री जिल्हा परिषद शाळा प्रकरणात गैरवर्तन आणि चुकीची माहिती प्रसारित केल्याचा ठपका ठेवत जिल्हा परिषद प्रशासनाने विस्तार अधिकारी (शिक्षण) श्रेणी-३ गोविंद हरिभाऊ लाखे यांना निलंबित केले आहे. मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी यासंदर्भात आदेश जारी केले असून, महाराष्ट्र जिल्हा परिषद सेवा (शिस्त व अपील) नियम १९६४ मधील नियम ३(१) अंतर्गत ही कारवाई करण्यात आली आहे. संबंधित अधिकाऱ्याने शाळेला भेट दिल्यानंतर चुकीची माहिती बाहेर प्रसारित केली तसेच माध्यमांमध्ये प्रसिद्ध केल्यामुळे जिल्हा परिषद संस्थेची बदनामी झाल्याचे प्रशासनाच्या निदर्शनास आले आहे. निलंबन कालावधीत लाखे यांचे मुख्यालय पंचायत समिती वेल्हा येथे निश्चित करण्यात आले आहे. गट शिक्षण अधिकाऱ्यांची पूर्वपरवानगी घेतल्याशिवाय त्यांना मुख्यालय सोडता येणार नाही. तसेच, निलंबन काळात कोणताही खाजगी व्यवसाय किंवा नोकरी करण्यास मनाई करण्यात आली आहे. दरम्यान, शासनाच्या नियमांनुसार निलंबन काळात त्यांना निर्वाहभत्ता देण्यात येणार असून, आदेशातील अटींचा भंग केल्यास पुढील शिस्तभंगाची कारवाई करण्यात येणार असल्याचा इशारा प्रशासनाने दिला आहे.

### खराडीतील अनधिकृत बांधकामांवर ‘सर्जिकल स्ट्राईक’

पुणे (दैनिक संध्या) : अनधिकृत बांधकामे आणि अतिक्रमणांविरुद्ध पुन्हा एकदा आक्रमक पवित्रा घेतला आहे. बुधवारी (दि. 15) पहाटेच्या सुमारास लोहगाव व खराडी परिसरात ‘सर्जिकल स्ट्राईक’ करत महापालिकेने तब्बल 52,250 चौरस फूट अनधिकृत बांधकाम जमीनदोस्त केले. यामध्ये लोहगाव येथील 7 आरएमसी प्लांट आणि खराडी ईऑन आयटी पार्क परिसरातील बेकायदा शेडचा समावेश आहे. आयुक्त यांच्या आदेशानुसार आणि अतिरिक्त आयुक्त पवनीत कौर, तसेच उपआयुक्त सोमनाथ बनकर यांच्या नियंत्रणाखाली ही मोहीम राबविण्यात आली. पहाटे 2 वाजता महापालिकेचे पथक लोहगाव येथील खांदवेनगर आणि महालक्ष्मी लॉन्स परिसरात दाखल झाले. या ठिकाणी असलेल्या 7 आरएमसी प्लांटवर बुलडोझर चालवण्यात आला. या प्लांटमुळे मोठ्या प्रमाणावर धूळ आणि प्रदूषण होत असल्याच्या तक्रारीही नागरिक करीत होते. कारवाईवेळी प्रीतम खांदवे यांनी अधिकाऱ्यांशी हुज्जत घालत गचांडी धरल्याची चांगलीच चर्चा रंगली होती. मात्र, या चर्चेत कोणतेही तथ्य नसल्याचे बनकर यांनी स्पष्ट केले. परंतु, खांदवे यांनी कारवाईदरम्यान हस्तक्षेप करण्याचा प्रयत्न केला. त्या वेळी वादावादी झाली. अतिक्रमण निरीक्षकांच्या अंगावर धावून गेले. त्यानंतर एमएसएफच्या पोलिसांनी पकडून पिंजऱ्यात टाकून प्रीतम खांदवे यांना पोलिस ठाण्यात नेले, असे बनकर यांनी सांगितले. या मोहिमेसाठी मोठा फौजफाटा तैनात केला होता. 16 जेसीबी, 5 गॅसकटर आणि 2 बेकरच्या साहाय्याने अनधिकृत बांधकामे पाडली. या मोहिमेत 75 एम.एस.एफ. जवान, 30 सहाय्यक अतिक्रमण निरीक्षक आणि 85 बिगारी सेवकांनी सहभाग घेतला. खराडी ईऑन आयटी पार्क परिसरातील मोकळ्या जागांवर उभारलेले कच्चे आणि पक्के शेड देखील या वेळी पूर्णपणे हटविण्यात आले.

# जेजुरीत ‘नारी शक्ती वंदन पदयात्रा’ उत्साहात पार

## महिलांच्या सक्षमीकरणाचा ठाम संदेश

जेजुरी (दै. संध्या)

जेजुरी शहरात “नारी शक्ती वंदन पदयात्रा” उत्साहात पार पडली. महिलांना निर्णय प्रक्रियेत हक्काचे स्थान मिळवून देणाऱ्या ‘नारी शक्ती वंदन अधिनियम’च्या समर्थनार्थ ही पदयात्रा आयोजित करण्यात आली होती.

या पदयात्रेचे नेतृत्व भाजपा महिला मोर्चा प्रदेश अध्यक्षा चित्रा वाघ, भाजपा पुणे महिला मोर्चा जिल्हा अध्यक्षा स्नेहल दगडे तसेच पुणे जिल्हा अध्यक्ष (दक्षिण) शेखर वढणे यांच्या नेतृत्वाखाली पार पडले.




या पदयात्रेचे नेतृत्व स्थानिक स्तरावर भारतीय जनता पार्टीचे माजी जेजुरी शहर अध्यक्ष गणेश भोसले यांच्या मार्गदर्शनाखाली फुरूसुंगी महिला मोर्चा भाजपा मंडल अध्यक्षा,वैशाली पवार, मध्य हवेली मंडल महिला मोर्चा भाजपा अध्यक्षा कल्पना हांडे, उरळी देवाची महिला मोर्चाच्या सुप्रिया भाडाळे, पुणे जिल्हा कार्यकारिणी सदस्य भाजपा उत्तम कांबळे ,संपदा खोमणे सुमती पुजारी, संगीता बोडरे, निकिता धुमाळ, विद्या कुदळे, दिपाली आव्हाळे, सविता घोडके व मोठ्या संख्येनं उपस्थित होते

पदयात्रेदरम्यान महिला सक्षमीकरण, सुरक्षा, आरोग्य आणि शिक्षण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर जनजागृती करण्यात आली. महिलांना समाजातील आणि राजकारणातील निर्णय प्रक्रियेत अधिक बळकटी मिळावी, यासाठी हा कायदा महत्त्वाचा असल्याचे यावेळी सांगण्यात आले.

## इंद्रायणीनगर परिसरातील उघड्या विहिरींवर संरक्षक जाळी

### नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य; संभाव्य अपघात टळण्यास मोठी मदत होणार

आळंदी (दै. संध्या)

शहरातील इंद्रायणीनगर परिसरात उघड्या अवस्थेत असलेल्या विहिरींमुळे अपघाताचा धोका निर्माण झाला होता. भाविक, पर्यटक, लहान मुले तसेच ज्येष्ठ नागरिकांच्या सुरक्षेचा प्रश्न ऐरणीवर आला होता. या पार्श्वभूमीवर उपनगराध्यक्षा सुजाताताई तापकीर आणि सभागृह नेते सचिन गिलबिले यांनी तातडीने पुढाकार घेत प्रशासनाकडे पाठपुरावा केला.



नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे आणि मुख्याधिकारी माधव खांडेकर यांच्याकडे लेखी मागणी सादर करत उघड्या विहिरींवर संरक्षक जाळी बसविण्याची मागणी करण्यात आली होती. या मागणीची दखल घेत नगरपरिषद प्रशासनाने त्वरित कारवाई करत धोकादायक ठिकाणांवरील विहिरींवर मजबूत संरक्षक जाळी बसवली आहे.

या उपाययोजनेमुळे संभाव्य अपघात टळण्यास मोठी मदत होणार असून परिसरातील नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत केले आहे.

नागरिकांच्या सुरक्षेला प्राधान्य देत प्रशासनाने घेतलेला हा निर्णय महत्त्वपूर्ण ठरत असल्याचे मत स्थानिकांनी व्यक्त केले. भविष्यातही अशा सुरक्षाविषयक प्रश्नांवर तत्परतेने कार्यवाही करावी, अशी अपेक्षा नागरिकांकडून व्यक्त होत आहे.

## प्रवचन सेवेचे मानधन इंद्रायणी स्वच्छता अभियानाला अर्पण

आळंदी (दै. संध्या)

इंद्रायणी नदी स्वच्छ व प्रदूषणमुक्त ठेवण्यासाठी आळंदी नगरपरिषदेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या ‘इंद्रायणी स्वच्छता अभियानाला’ नागरिकांचा वाढता प्रतिसाद मिळत आहे. समाजातील विविध स्तरांतून मिळणाऱ्या सहकार्यामुळे या उपक्रमाला बळ मिळत असून, गुरुवारी एका उल्लेखनीय कृतीने सर्वांचे लक्ष वेधले.

पवित्र इंद्रायणी तीरावर कै.सुरेश दिवाकर व कै.मुक्ताबाई निकम यांचा दशक्रिया विधी पार पडला. यावेळी श्री संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज संस्थान कमिटीचे विश्वस्त ह.भ.प. पुरुषोत्तम महाराज पाटील यांनी प्रवचन सेवेच्या माध्यमातून उपस्थितांना मार्गदर्शन केले. या प्रवचनासाठी देण्यात आलेले ७००० रुपयांचे मानधन न स्वीकारता त्यांनी ती रक्कम ‘इंद्रायणी स्वच्छता अभियानासाठी’ आळंदी नगरपरिषदेकडे सुपूर्द केली. या देणगीमुळे स्वच्छता अभियानाला आर्थिक बळ मिळणार असून, नदी व परिसर स्वच्छतेच्या कामांना गती येणार आहे. आळंदी नगरपरिषदेच्या वतीने या सामाजिक जाणीवेच्या कृतीबद्दल कृतज्ञता व्यक्त करण्यात आली. नगराध्यक्ष प्रशांत कुऱ्हाडे पाटील म्हणाले की, इंद्रायणी नदी ही आळंदीची ओळख असून तिची स्वच्छता राखणे ही सर्वांची सामूहिक जबाबदारी आहे. नागरिकांकडून मिळणारे सहकार्य प्रेरणादायी असून, अशा देणग्यांमुळे इतरांनाही या अभियानात सहभागी होण्याची प्रेरणा मिळत आहे. दरम्यान, शहर स्वच्छ व सुंदर ठेवण्यासाठी नागरिकांनी सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन नगरपरिषदेच्या वतीने करण्यात आले आहे.

## नीरा येथे ग्रामदैवत श्री लक्ष्मीमाता जत्रा उत्साहात संपन्न

नीरा (दै. संध्या)

पुरंदर तालुक्यातील नीरा येथे ग्रामदैवत श्री लक्ष्मीमाता जत्राउत्सव भक्तिभाव, उत्साह आणि पारंपरिक जल्लोषात मोठ्या थाटामाटात पार पडला. संपूर्ण गाव “लक्ष्मीमाता की जय”च्या जयघोषाने दुमदुमून गेले होते.

सकाळ पासूनच माता लक्ष्मी मंदिर परिसर फुलांच्या सजावटीने, पानांच्या तोरणांनी आणि आकर्षक विद्युत रोषणाईने उजळून निघाला होता. श्री महालक्ष्मी मातेच्या मूर्तीला मानकरी उत्तमराव घुले व अमोल घुले यांच्या हस्ते महाभिषेक करण्यात आला. यावेळी दत्ता चव्हाण, काका मोरे, दादा शिंदे, बाबुराव दगडे, अनिल चव्हाण, रामदास राऊत, विलास धायगुडे, कल्याण जेधे, सागर बागडे, बाळासो मोटे, बाळासो साळुंखे, विजय शिंदे, अनंता शिंदे, अशोक पोतदार, विलास धोत्रे, विजय सपकाळ आदी मान्यवर उपस्थित होते. दिवसभर विविध धार्मिक विधी, पूजा-अर्चा आणि भक्तिमय कार्यक्रमांनी वातावरण भक्तिरसात न्हालले होते. सायंकाळी ग्रामदैवताची आकर्षक सजविलेल्या पालखीतून गावात भव्य मिरवणूक काढण्यात आली. या मिरवणुकीत गुलालाची उधळण करत लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्वजण उत्स्फूर्तपणे सहभागी झाले. पारंपरिक ढोल-लेझीम पथक, विद्युत रोषणाईने सजविलेला रथ आणि फटाक्यांची आतषबाजी यामुळे मिरवणूक अत्यंत रंगतदार ठरली.

जत्रा उत्सवाच्या निमित्ताने गुरुवारी (दि. १६) सकाळी ‘इश्काचा बाण’ आणि सायंकाळी ‘तुफान’ या मनोरंजन कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते, ज्याला ग्रामस्थांनी मोठी गर्दी केली.

## चाकणला चुलत भावाकडून बहिणीवर अत्याचार, सात जणांवर गुन्हा दाखल

चाकण (दै. संध्या)

माणुसकीला काळिमा फासणारी आणि रक्ताच्या नात्याला कलंकित करणारी एक धक्कादायक घटना चाकण शहरात घडली. ज्या भावाकडे बहिणीच्या रक्षणाची जबाबदारी असते, त्याच चुलत भावाने आपल्या अल्पवयीन बहिणीचा विश्वासघात करत तिच्यावर वारंवार अत्याचार केले. इतकेच नव्हे, तर हे घृणास्पद पाप लपवण्यासाठी पीडितेचा बळजबरीने बालविवाह लावून देत तिला मृत्यूच्या दारात ढकलण्याचा प्रयत्न केला. याप्रकरणी उत्तर चाकण पोलिसांनी मुख्य आरोपी चुलत भावासह ७ जणांवर गुन्हा दाखल केला आहे.



किशोर गंगाधर वाईकर (रा. कांची इन्क्लेव्ह, चाकण.), अविनाश बाळासाहेब गोडे (रा. भेंडा नेवासा ता. नेवासा, जि. अहिल्यानगर), गंगाधर चिमाजी वाईकर (रा.चाकण), आण्णा मोरकर (पूर्ण नाव माहित नाही रा. भेंडा नेवासा, जि. अहिल्यानगर) यांच्यासह अन्य तीन महिलांवर उत्तर चाकण पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

चाकण पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पीडित अल्पवयीन मुलगी नोव्हेंबर २०२५ मध्ये आरोपी नराधम किशोरची पत्नी गरोदर असल्याने तिची काळजी घेण्यासाठी त्याच्या घरी आली होती. मात्र, घराच्या या सुरक्षित वातावरणातच तिच्यावर काळ ओढवला. किशोरने पीडितेचे फोटो व्हायरल करण्याची आणि तिला जीवे मारण्याची धमकी देऊन तिच्यावर वारंवार अत्याचार केले.

या अत्याचारामुळे पीडिता गरोदर राहिली. ही बाब समोर येताच आपले पाप उघड होईल या भीतीने किशोरने डॉक्टरांना खोटी माहिती देऊन पीडितेला गर्भपाताच्या गोळ्या दिल्या आणि तिचे बाळ पाडले. एवढ्यावरच न थांबता, हे प्रकरण कायमचे दाबण्यासाठी त्याने आपल्या मेहुण्यासोबत, म्हणजेच अविनाश बाळासाहेब गोंडे याच्याशी पीडितेचा बेकायदेशीर बालविवाह लावून दिला. २७ जानेवारी २०२६ रोजी चाकणमधील एका रेस्टॉरंटमध्ये हा विवाह सोहळा पार पडला. विवाहानंतरही पीडितेचे हाल संपले नाहीत.

पत्नी अल्पवयीन असल्याचे ठाऊक असतानाही पती अविनाशने तिच्यावर बळजबरी केली. तिने विरोध केला असता तिला बेदम मारहाण करण्यात आली. अखेर या असह्य जाचाला कंटाळून पीडितेने धाडस दाखवत पोलीस ठाणे गाठले आणि आपबिती सांगितली.

उत्तर चाकण पोलिसांनी या प्रकरणी कठोर पावले उचलत सात आरोपींविरुद्ध पोक्सो आणि बालविवाह प्रतिबंधक कायद्यानुसार गुन्हा नोंदवला आहे. वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र कदम यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक संगीता कदम या प्रकरणाचा अधिक तपास करत आहेत.

# जुन्नर आदिवासी भागात अवैध माती उत्खनन

## अवैध उत्खननामुळे रस्ते उद्ध्वस्त; प्रशासनावर संगनमताचा आरोप, कारवाईची मागणी

नारायणगाव (दै. संध्या)

जुन्नर तालुक्याच्या पश्चिम आदिवासी भागात अवैधरीत्या गौण खनिज उत्खनन करणाऱ्या मातीमाफियांनी अक्षरशः धुडगूस घातल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. रात्रीच्या वेळी अवजड वाहनांतून मोठ्या प्रमाणावर माती वाहतूक होत असून, त्यामुळे अपघातांचा धोका वाढला आहे. या अवैध वाहतुकीमुळे आदिवासी भागातील रस्त्यांची दयनीय अवस्था झाली असल्याची तक्रार स्थानिक ग्रामस्थांकडून करण्यात येत आहे.

आदिवासी भागातील सगळी गावे पेसाअंतर्गत असून, ग्रीन झोनमध्ये येतात. पेसा क्षेत्रातील घाटघर, जळवंडी, खडकंबे, उसरण, शिरोली, चावंड, निमगिरी, खांडेचीवाडी, बगाडवाडी, पारगाव, तळेरान, खुबी, करंजाळे, कोपरे, मांडवे आदी गावांमध्ये मशिनच्या साहाय्याने खुलेआम माती उत्खनन सुरू आहे. विशेष म्हणजे, संबंधित ग्रामपंचायतींच्या ग्रामसभेची कोणतीही परवानगी नसताना रात्रीच्या अंधारात चोरट्या मार्गाने ही माती वाहतूक केली जात असल्याचा आरोप करण्यात येत आहे.



याबाबत वारंवार महसूल विभागाला पत्रव्यवहार करूनही कोणतीही ठोस कारवाई होत नसल्याने महसूल प्रशासनावर नागरिकांनी तीव्र नाराजी व्यक्त केली आहे. मातीमाफियांवर अंकुश ठेवण्यात प्रशासन अपयशी ठरत असल्याची टीका देखील होत आहे. याप्रकरणी तत्काळ कारवाई न झाल्यास उपोषणाचा इशारा आदिवासी आजी-माजी सरपंच महासंघाचे जुन्नर तालुकाध्यक्ष पोपट रावते यांनी दिला आहे.

दरम्यान, महसूल प्रशासनाच्या दुर्लक्षामुळे मातीमाफिया आणि काही अधिकाऱ्यांमध्ये संगनमत असल्याचा संशय नागरिकांकडून व्यक्त केला जात आहे. आदिवासी भागातील निसर्गसंपत्तीची मोठ्या प्रमाणावर हानी होत असलेलीही हानी लक्षात घेता, प्रशासनाने तातडीने कारवाई करून या प्रकाराला आळा घालावा, अशी मागणी स्थानिकांकडून जोर धरत आहे.

अवजड वाहनांच्या सततच्या वाहतुकीमुळे आधीच जीर्ण अवस्थेत असलेले रस्ते अधिकच खराब झाले असून, स्थानिक नागरिक व वाहनचालकांना मोठ्या प्रमाणावर त्रास सहन करावा लागत आहे. काही वाहनचालक बेदरकारपणे वाहन चालवत असल्याने गंभीर अपघातांचाही धोका निर्माण झाला आहे.

## थोडक्यात पण महत्वाचे...



### मान्सूनपूर्व कामांचा आयुक्तांनी घेतला आढावा

मुंबई (दैनिक संध्या) : मान्सून पूर्व कामे वेळेत पूर्ण व्हावीत तसेच महापालिका कार्यक्षेत्रात पावसाळ्यात नागरिकांना कोणतीही अडचण निर्माण होऊ नये यासाठी सर्व यंत्रणांनी सज्ज राहावे. नालेसफाई, गटार स्वच्छता, खड्डे बुजविणे, धोकादायक झाडांच्या फांद्यांची छाटणी, तसेच स्ट्रीट लाईट दुरुस्ती, शहरातील सखल भाग, तसेच पाणी साचणाऱ्या ठिकाणांवर विशेष लक्ष ठेवून आपत्कालीन परिस्थितीत तातडीने उपाययोजना करता येतील याद्दष्टीने नियोजन करण्याच्या सूचना आयुक्त सौरभ यांनी आज झालेल्या बैठकीत सर्व विभागांना दिल्या. नागरी संशोधन केंद्र येथे झालेल्या बैठकीस अतिरिक्त आयुक्त 1, संदीप माळवी, अतिरिक्त आयुक्त 2 प्रशांत रोडे, सर्व उपायुक्त, सर्व सहायक आयुक्त व विविध विभागांचे विभाग प्रमुख उपस्थित होते. नागरिकांच्या समस्या थेट समजून घेण्यासाठी आणि कामांमध्ये पारदर्शकता राहण्यासाठी नगरसेवकांचा सहभाग महत्त्वाचा आहे. त्यामुळे प्रत्येक विभागाने नालेसफाईचे नियोजन करताना स्थानिक लोकप्रतिनिधींशी समन्वय साधावा, असेही आयुक्त सौरभ राव यांनी नमूद केले. तसेच शहरातील रेल्वे कलव्हर्टची सफाई नालेसफाईबरोबरच समांतर पद्धतीने करण्यात यावी, असेही निर्देश बैठकीत देण्यात आले. मान्सून कालावधीत पंपिंग स्टेशन, आपत्कालीन यंत्रणा आणि संबंधित विभागांमध्ये समन्वय ठेवून कामे करण्यात यावीत. प्रत्येक विभागाने आपल्या कार्यक्षेत्रात पाहणी करून प्रलंबित कामे लवकरात लवकर पूर्ण करावीत, असेही आयुक्तांनी नमूद केले. मान्सून काळात कोणत्याही प्रकारची आपत्कालीन परिस्थिती उद्भवल्यास तत्काळ प्रतिसाद देण्यासाठी मनुष्यबळ आणि साधनसामग्री उपलब्ध होईल याद्दष्टीने नियोजन करावे. सर्व अधिकारी व कर्मचाऱ्यांनी सतर्क राहून नागरिकांना दिलासा मिळेल, याची काळजी घ्यावी, असेही आयुक्त सौरभ राव यांनी स्पष्ट केले. आजपासून संपूर्ण घोडबंदर रस्ता हा फेरीवाला मुक्त करण्याचे निर्देश संबंधित उपायुक्त व सहायक आयुक्तांना यावेळी देण्यात आले माजिवडा, मानपाडा, वर्तकनगर या परिसरात रात्री उशिरापर्यंत अनधिकृतपणे व्यवसाय करणाऱ्या फेरीवाल्यांवर संपूर्ण मान्सून संपेपर्यंत दैनंदिन कारवाई सुरू राहिली पाहिजे असेही आयुक्तांनी नमूद केले.



### खासगी गृहसंकुलांना पाणी देण्यासाठी पालिका घेणार भाड्याने टँकर

मुंबई (दैनिक संध्या) : ठाणे महापालिका क्षेत्रात आणि विशेष करून दिवा प्रभाग समिती क्षेत्रात पाण्याचा प्रश्न गंभीर झाला असून ठाणे शहराबरोबरच दिव्यात असणाऱ्या अनेक मोठ्या गृहसंकुलांना आता खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचा निर्णय ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाच्या वतीने घेण्यात आला आहे. यासाठी महापालिका भाडेतत्वावर खासगी टँकर घेणार असून या खासगी टँकरसाठी महापालिकेवर वार्षिक सव्वा कोटींपेक्षा आधीकचा बोजा पडणार आहे. येत्या महासभेत हा प्रस्ताव मान्यतेसाठी पटलावर ठेवण्यात आला असून या प्रस्तावावरून महासभेत मात्र चांगलाच गदारोळ होण्याची शक्यता आहे. शहरात मुबलक पाणी पुरवठा असल्याचा दावा करणाऱ्या ठाणे महापालिकेच्या पाणीपुरवठा विभागाचा दावा किती पोकळ आहे, हे गेल्या अनेक वर्षांपासून प्रकर्षाने समोर आले आहे. उन्हाळ्याच्या सुरुवातीलाच पाणीटंचाईचे चटके ठाणेकरांना बसू लागले असून अनेक खासगी गृहसंकुलांमध्ये दररोजच टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जात आहे. यामुळे टँकर माफियांच्या माध्यमातून कोट्यवधी रुपयांची उलाढाल होत असल्याचे समोर आले आहे. ठाणे शहरातील काही भागात आणि विशेष करून दिव्यात पाणीप्रश्न चांगलाच पेटला आहे. दिव्यात अनेक ठिकाणी मोठ्या गृहप्रकल्पांची कामे सुरू असून काही निर्माणाधीन आहेत तर मोठ्या संख्येने या ठिकाणी गृहसंकुले उभी देखील राहिली आहे. मात्र आता एवढ्या मोठ्या प्रमाणात नागरिकांना झाल्यानंतर या नागरिकांना पाणी देण्यास विकासक कुचकामी ठरल्याने आता ठाणे महापालिकेनेच या मोठ्या गृहसंकुलात खासगी टँकरद्वारे पाणीपुरवठा करण्याचे निर्णय घेतला आहे. दिवा प्रभाग समिती क्षेत्रातील गृहसंकुलांना वार्षिक 2268 खासगी टँकरच्या फेऱ्या करून हा पाणीपुरवठा केला जाणार आहे. तर ठाणे शहरातील माजिवडा, मानपाडा, वर्तकनगर, उथळसर, नौपाडा, कोपरी वागळे, इस्टेट अशा काही भागात देखील खासगी टँकरच्या माध्यमातून पाणीपुरवठा केला जाणार आहे.



### खर्डी-कसारा तिसऱ्या लाईनमुळे लोकल प्रवास होणार जलद

मुंबई (दैनिक संध्या) : खर्डी ते कसारा दरम्यान उभारण्यात आलेल्या तिसऱ्या रेल्वे मार्गिकेचे काम आता पूर्णत्वास गेले असून, येत्या 12 मेपासून या मार्गावर ओव्हरहेड वायरला वीजपुरवठा सुरू करण्यात येणार आहे. त्यानंतर लवकरच या मार्गिकेवर रेल्वे गाड्यांची चाचणी आणि नियमित वाहतूक सुरू होण्याची शक्यता आहे. सध्या या मार्गावर लोकल आणि मेल-एक्स्प्रेस गाड्या एकाच मार्गिकेवर धावत असल्यामुळे अनेकदा लोकल गाड्यांना सिग्नलवर थांबावे लागते. परिणामी, प्रवाशांना उशीर आणि गैरसोयीचा सामना करावा लागत होता. मात्र, तिसरी स्वतंत्र मार्गिका उपलब्ध झाल्यानंतर ही समस्या मोठ्या प्रमाणात कमी होणार आहे. या नव्या मार्गिकेमुळे मेल-एक्स्प्रेस गाड्यांना स्वतंत्र मार्ग मिळणार असून, लोकल गाड्यांचा वेग आणि वेळापत्रक सुधारेल. यामुळे दररोज कामासाठी प्रवास करणारे नोकरदार, विद्यार्थी आणि व्यावसायिकांना मोठा फायदा होणार आहे. तसेच कसारा घाट परिसरातील रेल्वे वाहतूक अधिक सुरक्षित आणि सुरळीत होण्यास मदत होईल. रेल्वे प्रशासनाच्या या प्रकल्पामुळे संपूर्ण मध्य रेल्वे मार्गावरील ताण कमी होणार असून, भविष्यातील वाढत्या प्रवासी संख्येला सामोरे जाण्यासाठी ही मोठी पायरी ठरणार आहे. त्यामुळे कसारा मार्गावरील प्रवाशांची प्रतीक्षा अखेर संपली असून, आता अधिक जलद, सुरक्षित आणि वेळेवर प्रवासाची नवी आशा निर्माण झाली आहे.

# शासकीय अधिकारी, कर्मचाऱ्यांना मोठ्या आकाराची निवासस्थाने

## या निर्णयामुळे बदलत्या जीवनशैलीनुसार अधिक आधुनिक, सुसज्ज आणि प्रशस्त निवास सुविधा उपलब्ध होणार

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील शासकीय अधिकारी व कर्मचाऱ्यांसाठी बांधण्यात येणाऱ्या शासकीय निवासस्थानांच्या चटई क्षेत्रफळात सुधारणा करण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी घेतला आहे. या निर्णयामुळे बदलत्या जीवनशैलीनुसार अधिक आधुनिक, सुसज्ज आणि प्रशस्त निवास सुविधा उपलब्ध होणार आहेत.

सार्वजनिक बांधकाम विभागाच्या वतीने जारी करण्यात आलेल्या शासन निर्णयानुसार सातव्या वेतन आयोगानुसार विविध वेतनगटांनुसार निवासस्थानांचे चटई क्षेत्रफळ नव्याने निश्चित करण्यात आले आहे. यामध्ये टाईप ए ते टाईप जी पर्यंत विविध प्रकारच्या निवासस्थानांचा समावेश असून उच्च वेतन गटातील अधिकाऱ्यांसाठी 240 चौरस



मीटरपर्यंत तर निम्न वेतनगटासाठी 45 चौरस मीटरपर्यंत क्षेत्रफळ निश्चित करण्यात आले आहे.

मुख्य म्हणजे हा निर्णय नव्याने सुरू होणाऱ्या बांधकाम प्रकल्पांना लागू राहणार असून सध्या बांधकामाधीन किंवा पूर्ण झालेल्या निवासस्थानांवर याचा परिणाम होणार नाही. तसेच आधीच वाटप झालेल्या निवासस्थानांच्या श्रेणीमध्ये कोणताही बदल करण्यात येणार नाही, असेही यामध्ये स्पष्ट करण्यात आले आहे.

**दर्जेदार सुविधांचा समावेश**

या सुधारित आराखड्यांमध्ये बैठकीची खोली, भोजनकक्ष, शयनकक्ष, स्वच्छतागृह, स्वयंपाकघर, बाल्कनी, तसेच काही ठिकाणी कार्यालयीन कक्ष, अभ्यासिका व सेवक कक्ष यांचा समावेश करण्यात आला आहे. यामुळे अधिकाऱ्यांना अधिक सोयीस्कर व दर्जेदार निवास व्यवस्था मिळणार आहे.

प्रत्येक खोलीमध्ये इंटरनेट व दूरध्वनी सुविधा पॉईंट उपलब्ध करून देण्यात देण्यात येणार असून, बहुमजली इमारतींमध्ये जिने, कॉरिडॉर व इतर सामाईक सुविधा स्वतंत्रपणे विचारात घेतल्या जाणार आहेत.

## पित्याने केला अडीच वर्षांच्या चिमुकलीवर जीवघेणा हल्ला

मुंबई (दै. संध्या)

कल्याणमध्ये एक धक्कादायक घटना समोर आली आहे. कौटुंबिक वादातून पित्याने आपल्या अडीच वर्षांच्या चिमुकलीवर जीवघेणा हल्ला केला. आईच्या प्रसंगावधानामुळे मुलीचा जीव वाचला असून तिच्यावर सध्या मुंबईतील शीव रुग्णालयात उपचार सुरू आहेत.

कल्याण पूर्व येथील खडेगोळवली परिसरात राहणारे विलास दिनकर आणि त्यांची पत्नी लक्ष्मी यांच्यात मागील काही दिवसांपासून वाद सुरू होता. पतीच्या मारहाणीला कंटाळून लक्ष्मी ही आपल्या अडीच वर्षांची मुलगी अदितीला घेऊन माहेरी मध्यप्रदेशला गेली होती.

लक्ष्मीच्या म्हणण्यानुसार, विलास दिनकर तिच्या माहेरी जाऊन गुपचूप मुलगी अदितीला सोबत घेऊन कल्याणला परत आला. सुमारे 20 दिवस तो मुलीसह बेपत्ता होता. या दरम्यान लक्ष्मी हीने कोळसेवाडी पोलिस ठाण्यात तक्रार दाखल करून संपूर्ण घटना सांगितली होती. गुरुवारी सकाळी विलासने चिमुकली अदितीवर धारदार शस्त्राने हल्ला केला.

लक्ष्मीने तत्काळ बचाव करून मुलीला वाचवले. गंभीर जखमी अवस्थेत मुलगी अदितीला रुग्णालयात दाखल करण्यात आले. तिच्यावर उपचार सुरू आहेत. कोळसेवाडी पोलिसांनी आरोपी पिता विलास दिनकर याच्याविरुद्ध गुन्हा दाखल केला असून पुढील तपास सुरु केला आहे.

## वसई-विरारमध्ये विजेचा लपंडाव सुरूच

मुंबई (दै. संध्या)

वसई-विरार शहरात सध्या भीषण उकाड्याच्या पार्श्वभूमीवर वीज पुरवठ्याचा लपंडाव सुरू असून नागरिकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत आहे. शहरातील तापमान 34 अंश सेल्सिअसपर्यंत पोहोचले असताना महावितरणकडून दिवसातून तब्बल तीन ते चार तास वीज पुरवठा खंडित केला जात असल्याने नागरिकांचे दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. दुरुस्तीच्या नावाखाली वारंवार वीज खंडित होत असल्याने संताप व्यक्त केला जात आहे.

उन्हाळ्याच्या सुट्ट्या सुरू असल्यामुळे लहान मुले दिवसभर घरात असतात. मात्र, सततच्या वीज खंडितमुळे पंखे, कुलर आणि



इतर आवश्यक उपकरणे बंद पडत असल्याने मुलांना उकाड्याचा प्रचंड त्रास सहन करावा लागत आहे. वृद्ध नागरिक, आजारी व्यक्ती आणि लहान बालकांसाठी ही परिस्थिती अधिकच त्रासदायक ठरत आहे. दिवसभर उष्णतेने हैराण झालेल्या नागरिकांना रात्रीही वीज खंडितमुळे विश्रांती मिळत नसल्याचे चित्र आहे. महावितरणकडून सुरू असलेल्या दुरुस्ती कामांमुळे वीज पुरवठा खंडित होत असल्याचे सांगितले जात असले, तरी नागरिकांच्या मते ही समस्या रोजचीच झाली आहे.

नियोजनशून्य कामकाजामुळे कोणत्याही पूर्वसूचनेशिवाय वीज बंद केली जात असल्याने नागरिकांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. व्यवसायिकांनाही याचा फटका बसत असून लहान उद्योगधंदे आणि दुकानदारांचे नुकसान होत आहे. दरम्यान, शहरातील विविध भागांत वीज दुरुस्तीची कामे सुरू असल्याचे चित्र दिसत आहे.

काही ठिकाणी कर्मचारी जीव धोक्यात घालून उंच खांबांवर काम करताना दिसत आहेत, तर काही ठिकाणी यंत्रसामग्रीच्या साहाय्याने तातडीने दुरुस्ती सुरू आहे. मात्र, या कामांचा परिणाम नागरिकांवर होणाऱ्या त्रासाच्या स्वरूपात स्पष्टपणे जाणवत आहे.या पार्श्वभूमीवर तात्काळ दखल घेऊन वीज पुरवठा सुरळीत करावा,अशी मागणी होत आहे.

## राज्यातील बस स्थानकांतील स्वच्छतागृहे होणार 'मोफत'

### परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांची कोल्हापुरातून घोषणा

मुंबई (दै. संध्या)

राज्यातील लाखो प्रवाशांसाठी एक अत्यंत आनंदाची आणि महत्त्वाची बातमी समोर आली आहे. येत्या १ जूनपासून महाराष्ट्र राज्यातील सर्व बस स्थानकांवरील स्वच्छतागृहे प्रवाशांसाठी पूर्णपणे मोफत केली जाणार आहेत. राज्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी आज कोल्हापूर दौऱ्यावर असताना ही महत्त्वपूर्ण घोषणा केली.

परिवहन मंत्री प्रताप सरनाईक आज कोल्हापूर दौऱ्यावर होते. यावेळी त्यांनी कोणतीही पूर्वसूचना न देता कोल्हापुरातील मध्यवर्ती बस स्थानकाला (CBS) अचानक भेट दिली. मंत्र्यांच्या या धाडसी निर्णयामुळे स्थानकावरील प्रशासकीय अधिकाऱ्यांची चांगलीच धावपळ उडाली. या भेटीदरम्यान त्यांनी बस स्थानकातील कॅन्टीन आणि स्वच्छतागृहांची प्रत्यक्ष पाहणी केली.

स्वच्छतागृहाची पाहणी करताना तिथली चकाकी पाहून




मंत्र्यांनी कंत्राटदाराला टोला लगावला. "मी आज येणार आहे म्हणून ही एवढी स्वच्छता केली आहे का?" असा सवाल करत त्यांनी कर्मचाऱ्यांना धारेवर धरले. महत्त्वाचे म्हणजे, अनेक बस स्थानकांवर स्वच्छतागृहासाठी प्रवाशांकडून जादा पैसे आकारले जात असल्याच्या तक्रारी वारंवार येत होत्या. या तक्रारींची गंभीर दखल घेत सरनाईक यांनी संबंधित कंत्राटदाराला जाब विचारला आणि नियमांचे उल्लंघन झाल्यास कडक कारवाईचा इशारा दिला.

केवळ स्वच्छतागृहावरच न थांबता, मंत्र्यांनी बस स्थानकावरील कॅन्टीनलाही भेट दिली. तिथे लावण्यात आलेल्या दर फलकाबाबत (Rate Card) त्यांनी सविस्तर विचारणा केली. प्रवाशांची खाद्यपदार्थांच्या बाबतीत लूट होऊ नये, अशा सूचना त्यांनी यावेळी प्रशासनाला दिल्या. "प्रवाशांची गैरसोय खपवून घेतली जाणार नाही. १ जूनपासून महाराष्ट्रातील प्रत्येक एसटी स्थानकावर प्रवाशांना मोफत स्वच्छतागृहाची सुविधा मिळेल, यासाठी आम्ही कटिबद्ध" असल्याचे परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी यावेळी बोलताना स्पष्ट केले.

## लग्नाचे आमिष दाखवून तरुणीवर अत्याचार!

मुंबई (दै. संध्या)

लग्नाचे आमिष दाखवून एका 28 वर्षीय तरुणीवर वारंवार शारीरिक अत्याचार केल्याची आणि विविध कारणांसाठी तिच्याकडून तब्बल 8 लाख 8 हजार रुपये उकळून तिची फसवणूक करत दुसऱ्याच मुलीशी लग्न केल्याची घटना मिरा रोड परिसरात उघडकीस आली आहे. याप्रकरणी मिरा रोड पोलीस ठाण्यात आरोपीविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

मिरा रोड येथील गोकुळ व्हिलेज परिसरात राहणाऱ्या 28 वर्षीय पीडित तरुणीची ओळख आरोपी हितेश जयसिंग दामी (32) याच्याशी झाली होती. आरोपीने पीडितेला लग्नाचे आमिष दाखवून तिचा विश्वास संपादन केला. त्याने पीडितेच्या घरी जाऊन तिच्याशी वारंवार शारीरिक संबंध प्रस्थापित केले.

आरोपीने केवळ शारीरिक शोषणच केले नाही, तर लग्नाचे वचन दिल्याने पीडितेचा विश्वासार्हता फायदा घेत तिच्याकडून मोठी रक्कम उकळली. यामध्ये नवीन मोटारसायकलचे



डाउन पेमेंट करण्यासाठी, नवीन व्यवसाय सुरू करण्यासाठी आणि ऑफिसच्या फर्निचरसाठी तसेच प्लायवुड खरेदी करणे, घराचे भाडे आणि मोटारसायकलचे हप्ते भरण्यासाठी व कॅमेरे खरेदी करणे अशा वेगवेगळ्या कारणांसाठी त्याने 5 लाख रुपये रोख आणि 3 लाख 8 हजार रुपये ऑनलाइन असे एकूण 8,08,000 रुपये पीडितेकडून घेतले.

पीडितेने दिलेले पैसे परत न करता आणि दिलेले लग्नाचे वचन मोडून आरोपी हितेश दामी याने दुसऱ्या मुलीशी विवाह केला. आपली फसवणूक झाल्याचे लक्षात येताच पीडित तरुणीने मिरा रोड पोलीस ठाण्यात तक्रार नोंदवली. या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस उपनिरीक्षक पुनम जांभळे या करत आहेत.

## अपॅरल ग्रुपने तृप्ती डिमरी व्हिक्टोरिया सीक्रेट इंडिया’ची ब्रँड ॲम्बेसेडर

मुंबई (दै. संध्या)

अपॅरल ग्रुप, एक अग्रगण्य जागतिक फॅशन आणि जीवनशैली रिटेल समूहने तृप्ती डिमरीची व्हिक्टोरिया सीक्रेट इंडियाची पहिली ब्रँड ॲम्बेसेडर म्हणून नियुक्ती करून एका महत्त्वपूर्ण नव्या अध्यायाची घोषणा करत आहे.

आज, व्हिक्टोरिया सीक्रेट आणि पिंक या बाजारपेठेतील आघाडीच्या ब्रँड्सचा समावेश असलेल्या आणि आत्मविश्वास वाढवण्यासाठी, आनंद निर्माण करण्यासाठी व आकर्षकतेचा उत्सव साजरा करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या व्हिक्टोरिया सीक्रेटने, भारतात त्यांच्या 'समर सिग्नेचर' मोहिमेच्या शुभारंभाची घोषणा केली. या मोहिमेत प्रसिद्ध भारतीय अभिनेत्री आणि नवीन स्थानिक ब्रँड ॲम्बेसेडर, तृप्ती डिमरी प्रमुख भूमिकेत आहे. 'समर सिग्नेचर' कलेक्शनमध्ये आरामदायक आणि परिधान करण्यास सोपी अंतर्वस्त्रे (लॉन्जरी) आणि स्लीपवेअरचा समावेश आहे, ज्यामध्ये ब्रँडची प्रतिष्ठित, पारंपरिक पट्टेदार रचना (स्ट्राइप डिझाइन) आहे. या कलेक्शनची सहजता आणि ग्लॅमर, तसेच तृप्तीच्या सहज आत्मविश्वासाने प्रेरित होऊन, ही नवीन मोहीम 'समर सिग्नेचर' शैलींचे सार दर्शवते.

या कलेक्शनमध्ये सिग्नेचर स्ट्राइप लोगो टी-शर्ट, वायरलेस ब्रा आणि सिग्नेचर स्ट्राइप लोगो पॅन्टीचा समावेश आहे, जे रोजच्या आरामासाठी उत्तम आहेत. या कलेक्शनमधील स्लीपवेअरमध्ये सिग्नेचर स्ट्राइप्ड सॅटिन स्लिप, तसेच सिग्नेचर स्ट्राइप्ड सॅटिन लाँग पायजमा सेटचा समावेश आहे, जो कॅज्युअल, तरीही आलिशान



लाउंज लूक देतो. सिग्नेचर समर कलेक्शनसोबतच, स्थानिक ब्रँड ॲम्बेसेडर तृप्ती अभिप्रेत असलेले 'कूल एअर' कलेक्शन आणि मोहीम देखील लॉन्च होत आहे. यामध्ये कूलब्रा™ चा समावेश आहे, ज्यात श्वास घेण्यायोग्य, स्पर्शाला थंड वाटणारे पॅडिंग आणि अत्यंत मऊ विकिंग फॅब्रिक आहे, जे झटपट सुकते आणि दिवसापासून रात्रीपर्यंत वापरता येते. या घोषणेवर बोलताना, अभिषेक बाजपेयी, सीईओ, अपॅरल ग्रुप इंडिया म्हणाले: "व्हिक्टोरियाज सीक्रेटसाठी भारत ही एक उच्च-वाढीची आणि धोरणात्मकदृष्ट्या महत्त्वाची बाजारपेठ आहे. तृप्ती डिमरी ग्राहकांच्या नव्या पिढीचे प्रतिनिधित्व करते, जे आत्मविश्वास, व्यक्तिमत्व आणि जागतिक फॅशनच्या जाणिवेला महत्त्व देतात."

या भागीदारीबद्दल बोलताना, तृप्ती डिमरी म्हणाली, “व्हिक्टोरिया सीक्रेटसोबत भागीदारी करण्यास मी उत्सुक आहे—हा एक असा ब्रँड आहे जो व्यक्तिमत्त्वाचा आदर करतो आणि महिलांना त्यांच्या स्वतःच्या रूपात आत्मविश्वास बाळगण्यासाठी सक्षम करतो. सिग्नेचर कूलब्रा आणि समर सिग्नेचर कलेक्शन हे पूर्णपणे आराम आणि सुलभतेवर आधारित आहेत, आणि ही गोष्ट मला खूप भावते.”

गेल्या काही वर्षांत, 'अपॅरल ग्रुप' (Apparel Group) भारतात 'व्हिक्टोरिया सीक्रेट'ची (Victoria’s Secret) उपस्थिती सातत्याने विस्तारत आहे; याद्वारे ते प्रमुख महानगरांमध्ये आपल्या किरकोळ विक्री जाळ्याला बळकटी देत आहेत, तसेच आपली वेबसाइट आणि ॲपच्या माध्यमातून एक भक्कम 'ऑम्नीचॅनेल' (omnichannel) अनुभव निर्माण करत आहेत. तृप्ती डिमरी यांची नियुक्ती ही भारतीय बाजारपेठेत या ब्रँडने केलेली निरंतर गुंतवणूक आणि देशातील फॅशन-सजग ग्राहकांमध्ये अधिक सखोल सांस्कृतिक सुसंगतता निर्माण करण्याची त्यांची महत्त्वाकांक्षा अधोरेखित करते.

## थोडक्यात पण महत्वाचे...





### चाकणमध्ये 6.5 कोटींचा पतसंस्था घोटाळा; 36 जणांवर गुन्हा

चाकण (दैनिक संध्या) : साडेसहा कोटींपेक्षा अधिक रकमेच्या अपहारप्रकरणी खेड तालुक्यातील वाकी बुद्रुक येथील भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेच्या संचालक मंडळावर चाकण उत्तर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे. गुन्हे दाखल झालेल्यांमध्ये संबंधित संस्थेचे तत्कालीन अध्यक्ष, सर्व संचालक, खेड बाजार समितीच्या माजी उपसभापतींसह, ग्रामपंचायतीचे आजी माजी पदाधिकारी असलेल्या तब्बल 36 जणांचा समावेश आहे. याप्रकरणी सहकारी संस्था, नागरी बँका विभागाच्या प्रथम विशेष लेखापरीक्षक अधिकाऱ्यांनी तक्रार दिली आहे. या पतसंस्थेत 6 कोटी 53 लाख 92 हजार 42 रुपयांचा अपहार झाल्याचे तक्रारीत म्हटले आहे. याप्रकरणी रामदास हिरामण कड, तुकाराम पिराजी टोपे, किसन सोपान गारगोटे, बाळासाहेब पंडित गारगोटे, रवींद्र नामदेव गारगोटे, अनिल गोविंद टोपे, शिवाजी बाबूराव जरे, काळूराम पांडुरंग टोपे, राजाराम किसन टोपे, सुरेश रंगनाथ लोखंडे, दत्तात्रेय वाल्मीक गोरे , शांताराम बापू जगताप, विमल बबन गारगोटे, रामदास ज्ञानेश्वर जाधव, गोरख भागुजी टोपे, सुरेखा लक्ष्मणराव टोपे, मारुती ज्ञानोबा गारगोटे, राहुल रामदास टोपे, दत्तात्रय संतू टोपे, अंकुश रामदास जरे, नीलेश हनुमंत टोपे, सुरेश शिवाजी टोपे, संतोष दत्तात्रय टिपरे, सुरेखा लहू गारगोटे, सुरेखा संजय टोपे, काळुराम लक्ष्मण गारगोटे, शिवाजी दगडू टोपे, सूरज लक्ष्मण टोपे, सुरेखा लक्ष्मण टोपे, सारिका रोहिदास गारगोटे, रोहिदास तुकाराम गारगोटे, सुरेखा सुरेश लोखंडे, अनिता काळुराम गारगोटे, विशाल दत्तात्रय पवळे, रामदास संतू टोपे ( सर्व जण रा. वाकी बुद्रुक, ता. खेड, जि. पुणे) अशी गुन्हा दाखल झालेल्या 36 जणांची नावे आहेत. वाकी गावातील भैरवनाथ ग्रामीण बिगरशेती सहकारी पतसंस्थेत अपहाराचा हा संपूर्ण प्रकार सन 2013- 14 ते सन 2017- 18 या कालावधीत घडला असल्याचे पोलिसांनी सांगितले आहे.

### रेडियन्स इंटरनॅशनल स्कुलचा दहावीचा निकाल 100 टक्के

नारायणगाव (दैनिक संध्या) : पोदार करिकुलम सेंटर अंतर्गत कार्यरत रेडियन्स इंटरनॅशनल स्कूल , आळेफाटा येथील इयत्ता दहावी (CBSE) परीक्षेचा निकाल 100% लागला आहे. शैक्षणिक वर्ष 2025–26 मध्ये शाळेने उत्कृष्ट यश संपादन केले आहे. विद्यार्थ्यांच्या सातत्यपूर्ण मेहनतीमुळे आणि शिक्षकांच्या मार्गदर्शनामुळे यंदाही शाळेने गुणवत्तेची परंपरा कायम राखली आहे. यंदाच्या परीक्षेत क्षितिजा मंगेश कवडे हिने 96.4% गुण मिळवून प्रथम क्रमांक पटकावला. कनक सचिन डावखर आणि सिद्धेश किरण मुंगसे यांनी प्रत्येकी 95.4% गुण मिळवत संयुक्त द्वितीय क्रमांक मिळवला. सौरभ संतोष घोलप (94.4%) याने तृतीय क्रमांक मिळवला. तसेच वैष्णवी दत्तात्रय गुंजाळ (92.4%) आणि आरुष विशाल डेरे (90.2%) यांनीही उल्लेखनीय यश संपादन करत शाळेचा गौरव वाढवला. या सर्व विद्यार्थ्यांनी शाळेच्या शिस्तबद्ध वातावरण आणि गुणवत्तापूर्ण शिक्षण पद्धतीमुळे उत्तम कामगिरी केली आहे. विद्यार्थ्यांच्या या यशाबद्दल शाळेचे प्राचार्य, शिक्षकवर्ग तसेच पालकांनी विद्यार्थ्यांचे मनापासून कौतुक केले शाळेच्या व्यवस्थापनाने सांगितले की, “विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी आम्ही सातत्याने प्रयत्नशील आहोत. यश हे कठोर परिश्रम, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शन यांचे फलित आहे.” या यशामुळे परिसरात शाळेचे नाव उंचावले असून, पुढील शैक्षणिक वाटचालीसाठी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देण्यात आल्या.



### नवीन वाहनांऐवजी जुन्यांनाच पसंती; पुण्यात 44,800 पुर्ननोंदणी

पुणे (दैनिक संध्या) : वाढत्या महागाईच्या काळात नवीन वाहन खरेदी करण्याऐवजी पुणेकर आपल्या जुन्याच वाहनांना पसंती देत असल्याचे चित्र समोर आले आहे. पुणे प्रादेशिक परिवहन कार्यालयाने नुकतीच मागील आर्थिक वर्षाची (सन 2025-26) आकडेवारी जाहीर केली असून, यामध्ये तब्बल 44 हजार 800 जुन्या वाहनांची पुनर्नोंदणी (रि-रजिस्ट्रेशन) करण्यात आली आहे. एप्रिल 2025 ते मार्च 2026 या कालावधीत ही विक्रमी पुनरनोंदणी झाली आहे. जुन्या वाहनांमुळे होणारे प्रदूषण कमी करण्यासाठी आरटीओ प्रशासनाने कडक धोरण अवलंबले आहे. ज्या वाहनांची 15 वर्षे पूर्ण झाली आहेत, त्यांची फिटनेस टेस्ट अत्यंत काटेकोरपणे घेतली जात आहे. इंजिनची क्षमता, बेक, लाइट आणि सर्वांत महत्त्वाचे म्हणजे उत्सर्जन मानके पूर्ण करणाऱ्या वाहनांनाच पुढील पाच वर्षांसाठी रस्त्यावर धावण्याची परवानगी दिली जात आहे.

### आमदाराच्या दबावामुळे आरएमसी प्रकल्पावरील कारवाई रद्द

पुणे (दैनिक संध्या) : वडगाव खुर्द येथील रेडी मिक्स काँक्रीट (आरएमसी) आरएमसी प्रकल्पांवर शुक्रवारी पहाटे नियोजित केलेली कारवाई गुरुवारी रात्री उशीरा अचानक रद्द करण्यात आल्याची माहिती सूत्रांनी दिली. कारवाईला विरोध केल्याप्रकरणी नगरसेविकेच्या पतीविरोधात पोलिस तक्रार करणारे महापालिका प्रशासन एका आमदाराच्या दबावाखाली मात्र झुकल्याचे समोर आले आहे. लोहगाव - खांदवे नगरमधील ७आरएमसी प्रकल्प जमीनदोस्त केले. या कारवाईत भाजपच्या एका नगरसेविकेच्या पतीने आडकाठी आणण्याचा प्रयत्न केला, त्यांनी अधिकाऱ्यांच्या अंगावर धावून जात धमकावल्याचा आरोप करत त्यांच्याविरोधात पोलिसांत तक्रार देण्यात आली. या कारवाईनंतर शहरातील शहरातील वडगाव खुर्द (जुने गावठाण), धायरी, बावधन, उंड्री शेवाळवाडी या परिसरातीलही आरएमसी प्रकल्पांवर अशाच प्रकारे प्रभावी कारवाई करण्यात येणार असल्याचे महापालिका अधिकाऱ्यांनी छातीठोकपणे सांगितले होते. कोणत्या भागात कधी कारवाई करायची, याचे नियोजनही करण्यात आले होते. या नियोजनानुसार वडगाव खुर्द येथील नदीकिनारी व परिसरात असलेल्या आरएमसी प्रकल्पांवर शुक्रवारी पहाटे कारवाई करण्याचे नियोजन करण्यात आले होते. मात्र, या कारवाईची कुण कुण प्रकल्प मालकांना लागली. येथील एक प्रकल्प शहरातील एका आमदाराच्या नातेवाईकाचा आहे.

# उजनी धरणातून भीमा नदीत पाणी सोडणार

## पिण्याच्या योजनांना दिलासा, पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन

**इंदापूर (दै. संध्या)**

उजनी धरणातून भीमा नदीमध्ये शनिवार (दि. 18) पासून पाणी सोडण्याचा निर्णय घेण्यात आला आहे. उजनीतून भीमा नदीमध्ये एकूण 2 वेळा पाणी सोडण्यासाठी 7 टीएमसी पाणी राखून ठेवण्याचा निर्णय देखील गुरुवारी (दि. 16) सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये घेण्यात आला आहे, अशी माहिती राष्ट्रीय सहकारी साखर कारखाना महासंघाचे अध्यक्ष हर्षवर्धन पाटील यांनी या बैठकीनंतर गुरुवारी दिली.

भीमा नदीकाठावरील गावांमधील व नदीच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या पिण्याच्या नळ पाणीपुरवठा योजनांसाठी त्याचबरोबर जनावरांना पिण्यासाठी शनिवारपासून नदीपात्रात पाणी सोडण्यात येणार आहे. सध्याची परिस्थिती पाहता पाणी काटकसरीने वापरण्याचे आवाहन देखील हर्षवर्धन पाटील यांनी केले आहे. सोलापूरचे पालकमंत्री जयकुमार गोरे यांचे समवेत झालेल्या ऑनलाईन बैठकीला हर्षवर्धन पाटील यांच्यासह कृषिमंत्री दत्तात्रय भरणे तसेच सोलापूर जिल्हाधिकारी व जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी उपस्थित होते.



उजनी धरणामध्ये सध्या 80 टीएमसी पाणी शिल्लक असून, गेल्या वर्षीच्या तुलनेत 20 टीएमसी पाणी जास्त आहे. शनिवारी भीमा नदीपात्रात पाणी सोडल्यानंतर पुन्हा जून महिन्यात दुसरे आवर्तन सोडण्याबाबत जलसंपदामंत्री राधाकृष्ण विखे पाटील यांचे समवेत मे महिन्यात बैठक होऊन निर्णय घेतला जाईल, असे या बैठकीत पालकमंत्री जयकुमार गोरे यांनी नमूद केल्याची माहिती हर्षवर्धन पाटील यांनी दिली.

**योजनांना पाणी कमी पडू देऊ नये**

उजनी पाणलोट क्षेत्रातील प्रकल्पग्रस्त शेतकऱ्यांना पाण्याचा कोटा दिलेला आहे. त्यानुसार त्यांना पावसाळ्यापर्यंत पाणी पुरले पाहिजे, तसेच उजनी पाणलोट क्षेत्रातील गावांच्या पाण्यावर अवलंबून असणाऱ्या पिण्याच्या पाणी योजनांना देखील पाणी कमी पडू देऊ नये, अशी बैठकीत हर्षवर्धन पाटील यांनी केलेली मागणी मान्य करण्यात आली.

# पुरंदरच्या डोंगररांगांत करवंदाचा बहर

## आदिवासी बांधवांसाठी उत्पन्नाची संधी, तर निसर्गसौंदर्यामुळे पर्यटनालाही चालना

**सासवड (दै. संध्या)**

किल्ले पुरंदरच्या दक्षिणेकडील सह्याद्रीच्या डोंगररांगांत यंदा करवंदाच्या जाळ्यांना मोठ्या प्रमाणावर बहर आला आहे. हिरव्यागार वनराईत फुललेली करवंदाची झुडपे, रानफुले आणि औषधी वनस्पतींमुळे परिसराचे निसर्गसौंदर्य खुलून दिसत आहे.

‘काळी मैना’ म्हणून ओळखल्या जाणाऱ्या करवंदांमुळे स्थानिक आदिवासी बांधवांच्या उत्पन्नात वाढ होण्याची शक्यता व्यक्त होत आहे.



पुरंदर तालुक्यातील चिव्हेवाडी, देवडी, मिसाळवाडी, बहिरवाडी आणि घेरा पुरंदर परिसरात महादेव कोळी समाजाचे मोठ्या प्रमाणावर वास्तव्य असून, उन्हाळ्यातील प्रमुख उत्पन्नाचे साधन म्हणून करवंदाला विशेष महत्त्व आहे.

यंदा करवंदाच्या जाळ्यांवर चांगला फुलोरा आल्याने उत्पादन वाढण्याची चिन्हे आहेत. डोंगररांगांत पसरलेल्या या नैसर्गिक संपत्तीमुळे पर्यटकांचेही लक्ष वेधले जात असून, स्थानिक महिलांसाठी रोजगाराच्या संधी निर्माण होत आहेत.

मात्र, गेल्या दोन वर्षांत दळणवळणाच्या अपुऱ्या सुविधांमुळे रानमेवा मुख्य बाजारपेठेत पोहोचविण्यात अडचणी निर्माण झाल्या. परिणामी, अपेक्षित उत्पन्न मिळू शकले नाही. यंदा परिस्थिती सुधारेल आणि मेहनतीला योग्य मोबदला मिळेल, अशी आशा ग्रामस्थ व्यक्त करीत आहेत.

# शिरुरला भारनियमनाविरोधात भूमिपुत्र प्रतिष्ठानचे बेमुदत धरणे

**शिरूर (दै. संध्या)**

शिरूर शहर व ग्रामीण परिसरात होणाऱ्या मोठ्या प्रमाणात भारनियमनाविरोधात वारंवार निवेदन देऊन देखील कुठलीही सुधारणा होत नसल्याने महावितरण प्रशासनाचे लक्ष वेधण्यासाठी भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने आज शुक्रवार दि.१७ एप्रिल पासून शिरूर महावितरण कार्यालयाबाहेर बेमुदत धरणे आंदोलन सुरू करत असून तसे निवेदन शिरूर महावितरणचे उपकार्यकारी अभियंता शरद माने यांना देण्यात आले असल्याचे प्रतिष्ठानचे अध्यक्ष सुशांत कुटे यांनी सांगितले.

शहर व परिसरामध्ये अनेक महिन्यांपासून मोठ्या प्रमाणात वीजपुरवठा खंडित होत असल्याने नागरिकांना मोठा त्रास सहन करावा लागत आहे.यासंदर्भात मागील महिन्यात महावितरणला निवेदन देऊन शहर व परिसरामध्ये होत असलेल्या भारनियमनाबाबत भूमिपुत्र प्रतिष्ठानच्यावतीने केलेल्या सर्वेक्षणात एका दिवसात वीजपुरवठा खंडित होण्याचे प्रमाण किमान ४ ते ५ वेळा असून अर्धा तास ते ३ तासापर्यंत वीजपुरवठा खंडित होत असल्याचे निदर्शनास आले असल्याचे कुटे यांनी सांगितले.

# खडकवासला धरणातील पाणी 31 ऑगस्टपर्यंत राखीव

**खडकवासला (दै. संध्या)**

दर वर्षी 31 जुलैपर्यंत पिण्यासाठी पाणी राखीव ठेवण्यात येत असले, तरी यंदा ‘अल निनो’मुळे खडकवासला धरण साखळीतील पाणी 31 ऑगस्टपर्यंत पिण्यासाठी राखीव ठेवण्याचा निर्णय जलसंपदा विभागाने घेतला आहे. यंदा पाऊस उशिरा व पावसाचे प्रमाण कमी असल्याने उपलब्ध पाण्याचा शहर व जिल्ह्यातील एक कोटी नागरिकांना, तसेच 66 हजार हेक्टर शेतीला पुरेशा प्रमाणात पुरवठा करण्याचे मोठे आव्हान प्रशासनासमोर उभे आहे.

धरण साखळीत गुरुवारी (दि. 16) रोजी 12.26 टीएमसी (42.07 टक्के) पाणीसाठा शिल्लक होता. गतवर्षीपेक्षा 1.30 टीएमसी अधिक पाणी धरण साखळीत आहे. असे असले तरी गतवर्षीपेक्षा यंदा उन्हाची तीवता अधिक आहे. 40 डिग्री सेल्सिअसवर तापमान गेले आहे. त्यामुळे पाण्याची मागणी वाढली आहे, दुसरीकडे धरणातील पाण्याचे बाष्पीभवन वाढले आहे. त्यामुळे पाणीसाठ्यात दर तासागणिक घट सुरू आहे.

‘अल निनो’मुळे हवामान पाऊस लांबण्याची, तसेच कमी पावसाची शक्यता वर्तवली आहे. त्यामुळे आगामी साडेचार महिने पुणेकरांसह जवळपास एक कोटी नागरिकांची तहान भागविण्यासाठी जलसंपदा विभागाला कठोर उपाययोजना कराव्या लागणार आहेत. तीव उन्हामुळे आगामी काळात जवळपास एक टीएमसी पाण्याचे बाष्पीभवन होणार आहे. पाणीटंचाईचे संकट निर्माण होऊ नये, उपाययोजनांची प्रभावीपणे अंमलबजावणी करणे, शेतीच्या नावाखाली पाणीउपसा करणाऱ्या खडकवासला व इतर धरण तीरावरील हॉटेल, रिसॉर्ट, वॉटर पार्क, खासगी कंपन्या आदींवर कठोर कारवाई करण्यासाठी मोठी यंत्रणा जलसंपदा विभागाला उभी करावी लागणार आहे.

# समान पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात; एप्रिलअखेर सुरू होणार

## पुण्यातील रखडलेली समान पाणीपुरवठा योजना अंतिम टप्प्यात

**पुणे (दै. संध्या)**

अनेक वर्षांपासून रखडलेल्या हडपसर परिसरातील समान पाणीपुरवठा योजनेचे काम अंतिम टप्प्यात आले आहे. एप्रिलअखेर काळेबोराटेनगर व गाडीतळ बसथांब्याजवळील योजनेच्या टाक्या व वितरणाचे काम होऊन याअंतर्गत येणाऱ्या सर्व भागांना समान पाणीपुरवठा करण्याचे आश्वासन मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांनी दिले आहे. यापूर्वीही वेळोवेळी अशी आश्वासने देण्यात आली होती. मात्र, अद्यापी येथील योजना पूर्णत्वास आलेली नाही. त्यामुळे आतातरी महापालिकेकडून हे आश्वासन पाळले जाईल का? असा सवाल नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे.



हडपसर गावठाण, गाडीतळ, सातववाडी, गोंधळनगर, पंधरा नंबर, आकाशवाणी, लक्ष्मी कॉलनी, विठ्ठलनगर, काळेबोराटेनगर, ससाणेनगर, माळवाडी आदी भागांमध्ये गेल्या तीस-चाळीस वर्षांपासून कमी-अधिक प्रमाणात कायम पाणीटंचाईची समस्या जाणवत आहे. शहराबरोबरच उपनगरांतील पाणीप्रश्न सोडविण्यासाठी महापालिकेकडून काही वर्षांपासून 24 बाय 7 समान पाणीपुरवठा योजनेचे काम सुरू आहे. ही योजना रडत-खडत सुरू असल्याने अद्यापही येथील पाणी प्रश्न सुटू शकला नाही. योजनेच्या पाण्याकडे आ वासून बसलेल्या नागरिकांचा मात्र दरवर्षी हिरमोड होत आहे. सध्याही परिसरात ठिकठिकाणी नागरिकांना विशेषतः महिलांना रात्री-अपरात्री पाणी भरावे लागत आहे. तेही अपुरे व कमी दाबाने मिळते. पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांकडून वेळोवेळी फक्त आश्वासने देऊन पाणीपुरवठा योजनेच्या कामात चालढकल केली जात आहे. या पार्श्वभूमीवर येथील कार्यकर्ते पल्लवी व प्रशांत सुरसे यांनी मागील दोन वर्षांपासून सातत्याने पाठपुरावा करत अनेकवेळा पुणे महानगरपालिकेकडे निवेदने दिली होती. मात्र, दुर्लक्ष होत राहिले. दरम्यान, त्यांनी पालिका आयुक्त नवल किशोर राम यांची भेट घेऊन योजनेबाबत लेखी स्वरूपात स्पष्ट भूमिका मागविण्यात आली होती. त्याबाबत खुलासा न झाल्यास 30 मार्चपासून उपोषणाचा इशारा दिला होता.


दरम्यान, पाणीपुरवठा विभागाचे मुख्य अभियंता नंदकिशोर जगताप यांच्या सोबत या प्रश्नाबाबत बैठक घेण्यात आली. त्यामध्ये झालेल्या चर्चेनुसार संत गजानन महाराज मंदिर, काळे बोराटेनगर येथील 35 लाख लिटर क्षमतेची योजना येत्या पाच-सहा एप्रिलदरम्यान सुरू करण्यात येणार आहे. तर, हडपसर बस डेपो गाडीतळ येथील 45 लाख लिटर क्षमता असणारी योजना 15 ते 20 एप्रिलदरम्यान सुरू करण्यात येणार आहे.

# बारामतीत उष्णतेचा कडाका; 41°C तापमान

## उष्णतेमुळे जनजीवन विस्कळीत, आणे पठारावर पाणी व चाऱ्याची टंचाई गंभीर, शेतकरी व पशुपालक अडचणीत

**बारामती (दै. संध्या)**

तालुक्यातील तापमानाने एप्रिलच्या मध्यातच कळस गाठला असून, सलग दोन दिवस तब्बल 41 अंश सेल्सिअस तापमानाची नोंद झाली. वाढत्या उष्णतेमुळे संपूर्ण बागायती पट्टा होरपळून निघत असून, दैनंदिन जीवन विस्कळीत झाले आहे. सकाळी 11 ते सायंकाळी 4 या वेळेत रस्त्यांवर अक्षरशः शुकशुकाट पाहायला मिळत आहे. प्रखर उन्हाच्या झळा आणि उकाड्यामुळे नागरिक त्रस्त झाले असून, अत्यावश्यक कामांशिवाय बाहेर पडणे टाळले जात आहे. विशेषतः ज्येष्ठ नागरिक, लहान मुले आणि कामगार वर्गाला या उष्णतेचा मोठा फटका बसत आहे. उन्हाच्या तीवतेमुळे अंगाची लाही लाही होत आहे.




दरम्यान, उष्णतेपासून दिलासा मिळविण्यासाठी नागरिक थंड पेय, सरबत, कलिंगड, खरबूज आदी फळांची मागणी वाढली आहे. त्यामुळे बाजारपेठेत थंड पेय आणि हंगामी फळांची मागणी वाढली आहे. विक्रेत्यांनाही याचा काही प्रमाणात फायदा होत आहे. हवामान विभागाने पुढील काही दिवस तापमानात आणखी वाढ होण्याची शक्यता वर्तवली असून, नागरिकांनी दुपारच्या वेळेत बाहेर पडणे टाळावे, भरपूर पाणी प्यावे आणि उष्माघातापासून काळजी घ्यावी, असे आवाहन करण्यात आले आहे. तालुक्यात सध्या बदलत्या हवामानाचा आणि वाढत्या महागाईचा दुहेरी परिणाम नागरिकांसह शेतकरी वर्गावर होत आहे.

अवकाळी पावसानंतर उन्हाचा कडाखा वाढल्याने वातावरणात मोठा बदल झाला असून, याचा परिणाम शेती पिकांवर होत आहे. उष्णतेमुळे बाजारपेठांमध्ये दुपारच्या सत्रात तुलनेने कमी वर्दळ दिसून येत आहे. ग्रामीण भागात पाण्याची मागणी वाढू लागली असून, काही ठिकाणी पाणीटंचाईची चाहूल लागली आहे. शेतीमध्ये अवकाळी पावसामुळे आधीच नुकसान झाले त्यानंतर शेतकऱ्यांना आता वाढत्या तापमानामुळे पिकांच्या वाढीवर परिणाम होण्याची भीती आहे. भाजीपाला आणि फळबागांना याचा फटका बसला आहे. उत्पादन खर्चात वाढ आणि बाजारातील अस्थिर दर यामुळे शेतकरी आर्थिक तणावाखाली सापडले आहेत.

**आणे पठारावर पाणी, चाराटंचाई**

जुन्नर तालुक्याच्या पूर्व भागातील आणे, नळावणे, व्हरुंडी (शिंदेवाडी) परिसरात जनावरांच्या हिरव्या चाऱ्याचा प्रश्न दिवसेंदिवस गंभीर बनत चालला आहे. पिण्याच्या पाण्याची टंचाई जाणवू लागली आहे. तळी आणि विहिरी आटल्याने शेतकरी अडचणीत सापडले आहेत. या भागात उन्हाळ्याच्या तीव्रतेमुळे नैसर्गिक पाणीसाठे संपुष्टात आले आहेत. परिणामी जनावरांना पिण्याच्या पाण्यासह हिरवा चारा उपलब्ध होणे कठीण झाले आहे.